cmyk





# दैनिक राज्य लोकतंत्र



www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र वर्ष-५ अंक-१५० गुरूवार, दि.२५ सप्टेंबर २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने-६ किंमत ३ रूपये

# अर्ध्या महाराष्ट्राला अतिवृष्टी फटका:मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री मंत्री बांधावर

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याच्या जवळपास अर्ध्या भागाला अतिवृष्टी व पुराचा फटका बसला असून संकटात सापडलेल्या शेतक-यांच्या मदतीसाठी, कष्टाने उभारलेले त्यांचे संसार पुन्हा सावरण्यासाठी सरकारकडून भरीव मदत दिली जाईल. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री पूरग्रस्त भागातील दौऱ्यावरून परतल्यानंतर याबाबतची योजना नक्की केली जाईल अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिली.मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी थेट शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन शेतकऱ्याशी संवाद साधला आणि मदतीचे आश्वासन दिले.**

अर्ध्या महाराष्ट्रात अतिवृष्टीने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले यात मराठवाड्यात अधिक नुकसान झाले आज सोलापूर धाराशिव बीड जालना आदी भागात मंत्र्यांनी शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन संवाद साधला मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री सोलापूर धाराशिव या जिल्यात कृषी मंत्री दत्ता भरणे जालना मंत्री पंकजा मुंडे बीड आणि जालना मंत्री विखे पाटील आष्टी या भागात आले त्यांनी थेट बांधावर जाऊन पाहणी केली यानंतर मुंबईत महसूल मंत्री बावनकुळे यांनी, राज्याचा जवळपास अर्धा भाग पूरग्रस्त झाला असून पूरग्रस्त कुटुंब व शेतक-यांना तातडीने मदत देण्यासाठी सरकार तत्पर आहे. ती सुरूही झाली आहे. संपूर्ण मंत्रिमंडळ पूरग्रस्त भागातील पाहणीसाठी गेले आहे. मदतीसाठी सगळेच तयार आहेत. महसूल अधिका-यांना अचूक पंचनामे करण्याचे आदेश आपण दिले आहेत.बडे उद्योजक व कंपन्यांनी आपल्या सीएसआर फंडातून पूरग्रस्त शेतक-यांना मदत करण्याचे आवाहन आपण केले आहे. राज्यामध्ये पूर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री सध्या शेतक-यांच्या बांधावर पोहचले आहेत. दर तासाने मीदेखील राज्याचा आढावा घेत आहे. महसूल यंत्रणेतील सर्वांशी बोलत आहे. मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये सध्या मोठे नुकसान झाले असून शेतजमीन खरडून गेली आहे.शेतकरी टाहो फोडत आहेत. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहता कामा नये यासाठी त्यांचे पंचनामे होणे आवश्यक आहे. महसूल यंत्रणेने संपूर्ण ताकदीनिशी शेतकऱ्यांच्यामागे उभे राहावे. राज्यात एखादी नवीन योजना किंवा रस्त्याची कामे मागी राहिली तर चालतील पण शेतकऱ्यांना तातडीने मदत देऊ. शेतकरी हतबल होऊ नये यासाठी सरकार पुरेपूर काळजी घेईल असे सांगितले.

### त्यांचे संसार पुन्हा उभे करू

मराठवाड्यात हाताला आलेले पीक नाहीसे झाल्याने शेतकरी मोठ्या चिंतेत आहेत. पण, त्यांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. सरकार पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठिशी आहे. शेतकऱ्यांबाबत सरकारला आत्मीयता असून त्यांचे मोडलेले संसार पुन्हा उभे करून देण्याचे काम केले जाईल. त्यासाठी गावकऱ्यांनी देखील अधिकाऱ्यांनी पंचनाम्यासाठी मदत करावी.

## थोडक्यात...

### गुजरात; बलात्कारी आसाराम बापूची पूजा

गांधीनगर : सूरत येथे नवरात्र उत्सवात धक्कादायक घटना घडली आहे. येथील न्यू सिविल हॉस्पिटलमध्ये बलात्काराच्या आरोपामध्ये दोषी ठरवण्यात आलेल्या स्वयंघोषित संत आसाराम बापू याचा फोटो लावून पूजा करण्यात आली. एवढेच नव्हे तर त्याची आरतीही म्हटली. यामध्ये डॉक्टर, नर्सेस आणि हॉस्पिटलमधील इतर कर्मचारी देखील सहभागी झाले. हा प्रकार समोर आल्यानंतर सरकारी इमारतीत बलात्कारी आरोपीचे उदात्तीकरण कसे केले गेले असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.त्यावेळी झालेल्या आरतीत डॉ. जिगिश पटाडिया, नर्सिंग स्टाफ आणि सुरक्षा कर्मचारी देखील सामील झाले.

### रेल्वे कर्मचाऱ्यांना केंद्राकडून मोठं गिफ्ट

नवी दिल्ली : केंद्रीय मंत्रिमंडळाने दिवाळी आणि छठपूजेच्या आधी रेल्वे कर्मचाऱ्यांना एक मोठी भेट दिली आहे. आज बुधवारी २४ सप्टेंबर २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत १०.९१ लाखांहून अधिक रेल्वे कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांचा दिवाळी बोनस जाहीर करण्यात आला. यासाठी केंद्र सरकारने १,८६५.६८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे . दिवाळीपूर्वी रेल्वे कर्मचाऱ्यांना हा बोनस देण्यात येईल ट्रॅक मेंटेनर, लोको पायलट,गार्ड स्टेशन मास्टर, सुपरवायझर, तंत्रज्ञ, तंत्रज्ञ मदतनीस, पॉइंटमॅन, रेल्वे मंत्रालयाचे कर्मचारी आणि इतर गट कर्मचाऱ्यांना दिले जातील.

### योगी नरेंद्र मोदींचे उत्तराधिकारी समजतात

पाटणा : काँग्रेसाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी बुधवारी पाटण्यातील सदाकत आश्रम येथे आयोजित सीडब्ल्यूसीच्या बैठकीत सत्ताधारी पक्षांवर जोरदार हल्ला चढवला. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, बिहारचे मुख्यमंत्री नीतीश कुमार आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावरही थेट निशाणा साधला. केंद्रातील मोदी सरकारसह इतर राज्यांतील भाजप सरकारेही धार्मिक ध्रुवीकरण आणि सांप्रदायिक भावना ज्वलंत ठेवण्याची संधी शोधत असतात असे खरगे यांनी म्हटले आहे.नीतीश सरकारने विकासाचे आश्वासन दिले. पण, बिहारची अर्थव्यवस्था मागे पडत आहे म्हणत नितीश कुमारवर निशाणा साधला.

### जालना तहसीलदारांसमोरच तुंबळ हाणामारी

भोकरदन : तालुक्यातील चो-हाळा ते गारखेड हा वडिलोपार्जित रस्ता मोकळा करण्यावरून सुरू असलेल्या वादाचे रूपांतर तुंबळ हाणामारीत झाले. धक्कादायक बाब म्हणजे, ही घटना तहसीलदार ज्ञानेश्वर काकडे यांच्यासह महसूल अधिकारी समोर असतानाच घडली. या मारहाणीत सरपंच कमल लोखंडे यांच्यासह तीन जण गंभीर जखमी झाले असून पोलिसांनी १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.चो-हाळा ते गारखेड दरम्यानच्या गट क्रमांक ११५ आणि १२० मधील वडिलोपार्जित रस्ता काही शेतक-यांनी बंद केला होता. रस्ता मोकळा करून देण्यासाठी सरपंच कमल लोखंडे यांनी तहसीलदार ज्ञानेश्वर काकडे यांना निवेदन दिले होते.

### लेहमध्ये हिंसक उद्रेक; ४ ठार, ७२ जखमी

लेह : पर्यावरणवादी सोनम वांगचुक लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा आणि संविधानाच्या सहाव्या अनुसूचीमध्ये समावेश करण्याच्या मागणीसाठी १५ दिवसांपासून उपोषणावर आहेत. या आंदोलनाने हिंसक वळण घेतले. बुधवारी केंद्रशासित प्रदेश लडाखमध्ये विद्यार्थी आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाला. या चकमकीत ४ जण ठार झाले तर ७२ जण जखमी झाले. दरम्यान, केंद्र सरकारने रॅली, मोर्चास बंदी घातली आहे.सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ मोठ्या संख्येने विद्यार्थी रस्त्यावर उतरले. निदर्शकांची पोलिसांशी झटापट झाली, दगडफेक झाली आणि सीआरपीएफच्या एका वाहनालाही आग लावण्यात आली.



# जालन्यात धनगर समाजाचा ऐतिहासीक मोर्चा

## • फडणवीसांनी शब्द पाळावा नसता माफी मागावी-बोऱ्हाडे •

शिवाजी मस्के । जालना

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पहिल्या कॅबिनेटच्या बैठकीत धनगर समाजाला संवैधानिक एसटीचे आरक्षण देणार होते .आता त्यांनी द्यावं कसं द्यायचं हे आम्हाला माहीत नाही तुम्ही ठरवा. धनगर समाज राज्यघटनेत भटक्या विमुक्त प्रवर्गात नसेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर करावं आणि समाजाची जाहीर माफी मागणी असे आवाहन मल्हार योद्धा दिपक बोऱ्हाडे यांनी केले.**

तथापि सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय ,चार आयोगांनी नाकारलेले आरक्षण चौथी पास मनोज जरांगे पाटलांनी शासनाच्या छाताडावर बसून घेतलं त्यांना नावे ठेवण्यापेक्षा आम्ही जरांगेंकडून काय शिकतो याचा विचार धनगर समाज बांधवांनी केला पाहिजेत अशी टिप्पणी करत आम्ही सुद्धा सरकार च्या मुंडक्यावर पाय देऊन आरक्षण घेऊ असा इशारा बोऱ्हाडे यांनी दिला. धनगर समाजाला संवैधानिक एसटीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करावी यासाठी आठ दिवसांपासून आमरण उपोषणास बसलेले दिपक बोऱ्हाडे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी ( ता. २४) जालना शहरात धनगर समाजाच्या वतीने ऐतिहासिक विराट इशारा मोर्चा काढण्यात आला. सकाळपासूनच जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, खानदेशसह राज्याच्या विविध भागातून लाखोंच्या संख्येने धनगर समाज बांधव जालन्यात दाखल झाले. दुपारी १२.२० वा. गांधी चमन येथून मोर्चास प्रारंभ झाला. हातात राष्ट्रमाता महाराणी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे ध्वज घेऊन भंडाऱ्याची उधळण करत आंदोलकांनी येळकोट,, येळकोट,,,जय मल्हार.,

▶▶ पान २ वर

### धरणे आंदोलन, रास्ता रोको करा...!

दीपक बोऱ्हाडे यांनी पुढील आंदोलनाची दिशा स्पष्ट करतांना दि २६ सप्टेंबर रोजी राज्यातील प्रत्येक तहसील, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवस धरणे आंदोलन. दि. २९ सप्टेंबर ला प्रत्येक आमदार, खासदारांच्या घरासमोर धरणे , विशेषत: भाजप आमदारांच्या घरासमोर ढोल वाजवून आंदोलन करा. दि. ०१ ऑक्टोंबर रोजी प्रत्येक रस्ता, गल्ली, चौक, शांततेच्या मार्गाने जाम करा अशी रुपरेषा विषद केली.

### १००० पोलिसांचा फौजफाटा

दिपक बोऱ्हाडे यांच्या आमरण उपोषण स्थळी मिळत असलेला समाज बांधवांचा प्रतिसाद पाहता, धनगर समाजातर्फे काढण्यात आलेल्या विराट इशारा मोर्चासाठी पोलीस प्रशासनातर्फे सुरक्षेच्या दृष्टीने विशेष खबरदारी घेण्यात आली स्वत: जिल्हा पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक, तीन डीवायएसपी, १४ पोलीस निरीक्षक, ४८ पोलीस उपनिरीक्षक, होमगार्डचे पाचशे कर्मचारी, एस. आर .पी.एफ.च्या तीन तुकड्या, आर .सी.पी.च्या चार तुकड्या असा एक हजार पोलीस दलाचा फोज फाटा बंदोबस्तात तैनात करण्यात आला होता.

# पंकजा मुंडेंनी बैलगाडीतून केली नुकसानीची पाहणी



गेवराई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज जिल्ह्यात बैलगाडीतून नुकसानीची पाहणी केली. जिल्हयात अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले असून शासनामार्फत जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत असे त्यांनी सांगितले.

मागील आठवड्यानंतर जिल्हयात पुन्हा एकदा गेल्या दोन दिवसांपासून जोरदार अतिवृष्टी झाली. विशेषत: शिरूर कासार, बीड ग्रामीण, गेवराई, माजलगांव या तालुक्यांना अतिवृष्टीचा जोरदार तडाखा बसला, अनेकांच्या घरांचे नुकसान झाले, संसार उघडय़ावर आले तर पिकांमध्ये तळे साचले, जमीन पार खरडून गेली. ना. पंकजाताई मुंडे अतिवृष्टीचा दौरा करून कॅबिनेट बैठकीसाठी मुंबईला गेल्या आणि त्याच दिवशी जिल्हयात

▶▶ पान २ वर

### कंकालेश्वर मंदिरासाठी ९ कोटी १४ लाखाचा निधी

मुंबई । प्रतिनिधी



कंकालेश्वर मंदिर, ता.जि.बीड या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन, दुरुस्ती कामासाठी येणाऱ्या ९,१४,५४,४०३/- (रु.नऊ कोटी चौदा लक्ष चौपण्ण हजार चारशे तीन मात्र) इतक्या रकमेस प्रशासकीय

▶▶ पान २ वर

### माळ चौथी



चतुर्थीचे दिवशीं<br>
विश्वव्यापक जननी हो ।।<br>
उपासकां पाहसी अंबे<br>
प्रसन्न अंत:करणीं हो ।।<br>
पूर्णकृपे पाहसी<br>
जगन्माते मनमोहिमी हो ।।<br>
भक्तांच्या माउली सुर<br>
ते येती लोटांगणीं हो ।। ४ ।।<br>
उदो बोला उदो<br>
अंबाबाई माउलीचा हो ।<br>
उदोकारें गर्जती काय<br>
महिमा वर्णू तिचा हो ।।

# आ.धस यांनी माडल्या मंत्री विखे पाटला समोर शेतकऱ्यांच्या व्यथा

आष्टी । प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेच आहे..परंतु शासन खंबीरपणे आपल्या पाठीशी आहे. शेतकऱ्यांच्या व्यथांची जाणीव आहे. मतदारसंघातील एकही गुंठ्याचा नुकसानीबाबत पंचनामा राहणार नाही. याची आमदार सुरेश धस यांचे साक्षीने ग्वाही देतो. असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

आष्टी तालुक्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर आलेल्या जलसंपदा



मंत्री ना राधाकृष्णजी विखे पाटील यांनी अहिल्यानगर आणि बीड जिल्ह्यातील गेल्या आठ दिवसांमध्ये झालेल्या अतिवृष्टी व ढगफुटीमुळे निर्माण झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आले..असता त्यांनी आमदार सुरेश धस यांच्या समवेत

▶▶ पान २ वर

# लक्ष्मण हाकेंच्या सहकाऱ्यावर प्राणघातक हल्ला

बीड । प्रतिनिधी

**ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या जवळच्या सहका-यावर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना मंगळवारी रात्री घडली. जालना येथील मोर्चाला जात असताना हाकेंचे निकटवर्तीय पवन कंवर हे त्यांच्या इतर दोन मित्रांसोबत माजलगाव जवळ जेवण करायला ढाब्यावर थांबलेले होते. त्याचवेळी ३५-४० जणांनी लाठ्या-काठ्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. यात पवन कंवर जबर जखमी झाले.**

केरवाडी पालम येथील रहिवासी पवन कंवर हे लक्ष्मण हाके यांच्या महत्त्वाच्या साथीदारांपैकी एक आहेत. हाकेंचे ते विश्वासू सहकारी म्हणूनही त्यांना ओळखले जाते. त्यांच्यावर टोळक्याने अचानक प्राणघातक हल्ला केल्याचा प्रकार घडला.ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांची

▶▶ पान २ वर



### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६९.०० क्विंटल | २,२९१ | २,८९९ | २,५७५ |
| ज्वारी/हायब्रिड: ६६.५० क्विंटल | २,०७० | ३,१५२ | २,३६६ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ९.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| उडीद : ४९.०० क्विंटल | ३,८०० | ५,९०० | ५,१९५ |
| बाजरी: ११०.०० क्विंटल | २,२०० | ४,५०० | २,६८८ |
| मुग: १६.५० क्विंटल | ४,४०० | ७,६७१ | ५,९८६ |
| सोयाबीन: ४.०० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ४,९५० | ४,९५० | ४,९५० |

# सौर 'समृध्दी' देणारा देशातील पहिला 'एक्सप्रेस वे'

नागपूर । प्रतिनिधी

**नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग आता केवळ वेगवान प्रवासाचा मार्ग राहिला नाही, तर तो देशातील पहिला असा 'एक्सप्रेस-वे' ठरला आहे जिथे सौरऊर्जा निर्मिती सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हा पुढाकार घेऊन ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.**



विदर्भातील कारंजा लाड (वाशीम जिल्हा) आणि मेहकर (बुलढाणा जिल्हा) येथील इंटरचेंजवर सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. पहिल्या टप्प्यात कारंजा लाड येथे ३ मेगावॅट आणि मेहकर येथे २ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.हा प्रकल्प 'महा समृद्धी नूतन ऊर्जा कंपनी'मार्फत उभारले गेले असून, या कंपनीचा 'एमएसआरडीसी' बरोबर २०२२ मध्ये करार झाला होता. या करारानुसार महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे वीज विक्री केली जाणार

▶▶ पान २ वर

# हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्या

## • मुख्यमंत्र्यांकडे धाराशिव येथील आमदारांची मागणी

धाराशिव । प्रतिनिधी

पंजाब सरकारने अतिवृष्टीमुळे हेक्टरी ५० हजार रुपये मदत जाहीर केली आहे. त्याच धरतीवर अशीच मदत महाराष्ट्र सरकारने धाराशिव भागातील शेतक-यांसाठी जाहीर करावी, तसेच शेतक-यांचे सरसकट कर्ज माफ करावे अशा अशायाचे निवेदन धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले. या वेळी त्यांच्यासोबत आमदार कैलास

▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# दहशतीचा पाऊस पुन्हा पडणार !

महाराष्ट्राला पुन्हा एकदा हवामान विभागाने मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यातील हवामानात मोठे बदल होत असून येत्या दोन दिवसांत अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर वाढणार आहे. नवरात्रोत्सवाला सुरुवात झाल्यानंतर पहिल्याच दिवशी पावसाने दांडिया नृत्य दाखवले. हवामान खात्याच्या माहितीनुसार २४ ते २७ सप्टेंबरदरम्यान अतिवृष्टी होऊ शकते. २५-२६ सप्टेंबर रोजी चक्रीवादळासारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हवामानात मोठे बदल होऊन पावसाची तीव्रता वाढेल. पावसामुळे सोयाबीन, कापूस, हळद, कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. सोलापूर आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये ढगफुटीसदृश पावसामुळे शेती व घरांमध्ये गुडघाभर पाणी साचले. अनेक पिकांचे नुकसान झाले असून शेतक-यांसाठी सरकारकडे तातडीने मदतीची मागणी करण्यात आली आहे. ओला दुष्काळ जाहीर करून पंचनामे करण्याची मागणी होत आहे.

दरवर्षी सप्टेंबरअखेर मान्सून माघारीचा प्रवास सुरू होतो. मात्र, यंदा हवामानातील बदलांमुळे मान्सूनचा परतीचा प्रवास उशिरा सुरू होईल. ५ ते १० ऑक्टोबर दरम्यान महाराष्ट्रातून मान्सून माघार घेण्याची शक्यता असून अजून काही दिवस राज्यात पावसाचे वातावरण कायम राहणार आहे. महाराष्ट्र आणि देशाच्या इतर भागात अजूनही मुसळधार पाऊस सुरू आहे. यंदाची दिवाळी पावसातच साजरी करावी लागणार असे दिसते. नियोजित वेळेआधीच देशात दाखल झालेला मान्सून नियोजित तारखेच्या आधीच परतीचा रस्ता धरेल असा अंदाज आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार मान्सून १५ ऑक्टोबरपर्यंत भारतातून जाण्याची शक्यता आहे. मान्सूनचा हंगाम दिवाळीपर्यंत राहण्याची शक्यता आहे. राज्यात त्याचे वास्तव्य १० ऑक्टोबरपर्यंत राहील. बंगालच्या उपसागरात २२ सप्टेंबरपासून कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होऊन २४ सप्टेंबरपर्यंत ते अधिक तीव्र होण्याचा अंदाज आहे. परिणामी मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, कोकण किनारपट्टी, मुंबईमध्ये २७ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान मुसळधार कोसळू शकतो.

पावसासाठी पोषक असे वातावरण तयार होत असल्याने राज्यात पुन्हा जोरदार सरी बरसण्याची शक्यता आहे. मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्राला २५ ते २८ सप्टेंबरदरम्यान अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. सध्या मराठवाड्यासह काही भागात मुसळधार पावसाने कहर केला आहे. मुंबई, पुणे, बीड, धाराशिव, लातूरसह आसपासच्या भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. राज्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. सध्या संपूर्ण मराठवाडा पाण्याखाली गेला आहे. मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले आहे. हवामान विभागाने आणखी एक आठवडा पावसाची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे मराठवाड्यातील शेतीचे आणखीन नुकसान होण्याची शक्यता आहे. मान्सून कोसळत असल्याने परतीच्या पावसाबाबत सध्या तरी अंदाज बांधता येत नाही. मराठवाड्यात ब-याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र व विदर्भात पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत राज्यात अनेक जिल्ह्यांत मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज आहे. विदर्भ व मराठवाड्यातील काही भागात दुपारनंतर पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. २७ सप्टेंबर रोजी विदर्भ, मराठवाडा, खान्देश, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील विविध भागात पाऊस मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून पुराच्या पाण्याने अनेक गावांना वेढा घातला आहे. दिवसागणिक अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे भयावह वास्तव समोर येत आहे. या पावसाचा सर्वाधिक फटका बळिराजाला बसला आहे. खरीप हंगामातील हातातोंडाशी आलेले उभे पीक पावसाने मातीमोल केले आहे.

## पूरग्रस्तांसाठी राष्ट्रवादीचे आमदार-खासदार १ महिन्याचा पगार देणार

मुंबई । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशानुसार राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व मंत्री, खासदार, आमदार आणि विधानपरिषद आमदार आपला एक महिन्याचा पगार मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करणार आहेत. पक्षाचे राज्याध्यक्ष सुनील तटकरे यांनी ही माहिती दिली असून, महाराष्ट्रातील महापुराच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. तत्पूर्वीच राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनीही आपला १ महिन्याचा पगार पूरग्रस्तांच्या मदतीसाठी देणार असल्याचे जाहीर केले होते.

आता, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडूनच सर्व आमदार, खासदारांना तशा सूचना देण्यात आल्या आहेत. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात पुरामुळे मोठे नुकसान झाले असून बळीराजाच्या डोळ्यात अश्रूंच्या धारा आहेत. बळीराजाचे हेच अश्रू पुसण्यासाठी हा प्रयत्न केला जात आहे.संकटाच्या या कठीण काळात प्रत्येक नेत्याने महाराष्ट्राच्या जनतेसोबत उभे राहणे गरजेचे असल्याचे तटकरे यांनी सांगितले. दरम्यान, उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी पूर्वनियोजित सर्व कार्यक्रम रद्द करत थेट पूरग्रस्त भागात भेट दिली. आज ते सोलापूर, धाराशीव आणि बीड या जिल्ह्यांना स्वत: भेट देत असून स्थानिक मंत्र्यांसोबत पूरपरिस्थितीची पाहणी करत आहेत. अजित पवार यांनी आज पीडित नागरिकांशी संवाद साधला आणि प्रशासनाला तातडीने शेतक-यांसाठी मदत देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, सर्व राष्ट्रवादीचे मंत्री आणि आमदारांनी आपापल्या भागात मदतीचे काम सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत.दरम्यान, यासोबतच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने लवकरच आणखी काही मदत योजनांची घोषणा करण्यात येणार असल्याचेही सुनील तटकरे यांनी सांगितले. पक्षाच्या या एकत्रित उपक्रमामुळे पूरग्रस्त कुटुंबांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेहमीच शेतकरी, कामगार व सर्वसामान्य नागरिकांसाठी खंबीरपणे उभा आहे असेही ते म्हणाले.

**अन्नधान्य वाटपास सुरुवात : भुजबळ**

पूरग्रस्त बाधित प्रत्येक कुटुंबाला १० किलो गहू-तांदूळ वितरण करण्यास सुरुवात झाली असून आतापर्यंत २६५४ कुटुंबाना मदत केली आहे. साडेसव्वीस मेट्रिक टन गहू तांदूळ दिला आहे, आमच्या विभागाकडून अन्नधान्य पुरवठा केला जातो आहे, केंद्राची मदत १०० टक्के येईल,ढगफुटी अनेक ठिकाणी होत आहे, ग्लोबल वॉर्मिंगचे परिणाम दिसून येत आहेत. त्यामुळे, टाऊन प्लॅनिंग करताना विचार व्हायला हवा, असे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले

# होय व्यसनमुक्ती शक्य-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**व्यसन म्हणजे व्यक्तीला लागलेली अशी एखादी सवय जिच्यामुळे संबंधित व्यक्तीचे मोठ्या प्रमाणावर शारीरिक, मानसिक व सामाजिक नुकसान होत असूनही आपल्या त्या सवयीत बदल करणे त्या व्यक्तीला शक्य होत नाही.दारू ही शरीरासाठी अतिशय हानिकारक असते. दारू मुळे अनेकांचे संसार, घर बरबाद झालेले आपण पाहतो. त्याच बरोबर अनेकांना अपंगत्व सुद्धा आलेलं आहे. किडन्या फेल होणं, लिव्हर खराब होणं हे सुद्धा दारूच्या अति सेवनाने होतं.**



अनेकाची लिव्हर खराब झाल्याने त्यांचा मृत्यु होतो हे सुद्धा आपण पाहिलेलं आहे. कोणत्याही प्रकारच्या व्यसनांचे शरीरावर दुष्परिणाम होतातच. हे परिणाम शारीरिक तर असतातच, पण मानसिक, व्यवहारीक आणि सामाजिक देखील होतात. सिगारेट ओढणे, दारू पिणे, मादक पदार्थांचे सेवन करणे, मावा (सुगंधी तंबाखू) खाणे इत्यादींमुळे दात, घसा, फुप्फुसे, हृदय, जठर, मूत्रपिंडे, तसेच श्वसनसंस्था आणि पचनसंस्था यांचे विकार होऊन कर्करोग व इतर भयंकर रोग होतात. अनेक व्यसनी रुग्णांना डायलिसिस करावे लागते व्यसनांमुळे मन व बुद्धी अकार्यक्षम बनून मानसिक त्रास होतो. तसेच व्यसनांची पूर्तता करण्यासाठी बरेच पैसे खर्च होतात; म्हणून व्यसन म्हणजे 'विकतचे दुखणे' होय. व्यसन म्हणजे मानसिक आरोग्याला लागलेले खग्रास ग्रहण असते. यामध्ये चिंता, नैराश्य, विस्मरण होणे, स्मृतिभ्रंश हे त्रास होतातच. पण आनंद आणि दुःखाचे हिंदोळे वेगाने बदलणारे 'मूड स्विन्ज' या व्यक्तीत प्रकर्षाने आढळून येतात. आक्रमकता आणि गुन्हेगारी वृत्ती वाढते, संशयी वृत्ती हा व्यसनांचा परिपाक असतो आणि मानसिक आरोग्याचा ऱ्हास होऊन निरोगी व्यक्तीचे मानसिक रुग्णात रुपांतर होते. दैनंदिन जीवनात उद्भवणार्या समस्यांची काही उदाहरणे, उदा. परिक्षेच्या वेळी आजारी पडणे, प्रामाणिकपणे अभ्यास करूनही अपेक्षित यश न मिळणे, नोकरी न मिळणे, घरात भांडण-तंटे, लग्न न होणे, लग्न झाले तर पती-पत्नीचे न पटणे, धंदा न चालणे, दारिद्र्य, शारीरिक आजार अशा समस्या उद्भवतात. व्यसन करण्यासाठी इष्ट-अनिष्ट, योग्य-अयोग्य, अनैतिक, पाप, चोरी, मानवतेला काळिमा फासणाऱ्या गोष्टी... काय वाटेल ते करण्याची मनाची तयारी होते. ती व्यक्ती त्या सवयीच्या पूर्ण आहारी जाते, त्या सवयीचा एकनिष्ठ गुलाम बनते. यामुळे समाजात त्या व्यक्तीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो.प्रत्येक व्यसनी व्यक्ती हा चांगलाच असतो पण आपल्याला व्यसनामुळे फक्त त्याच्या वागण्यात बदल दिसत असतो.. दारू ही शरीरासाठी अतिशय हानिकारक असते. दारू मुळे अनेकांचे संसार, घर बरबाद झालेले आपण पाहतो. त्याच बरोबर अनेकांना अपंगत्व सुद्धा आलेलं आहे. किडन्या फेल होणं, लिव्हर खराब होणं हे सुद्धा दारूच्या अति सेवनाने होतं. अनेकाची लिव्हर खराब झाल्याने त्यांचा मृत्यु होतो हे सुद्धा आपण पाहिलेलं आहे. व्यसनमुक्ती उपचार व्यसनापासून मुक्त करताना रुग्णाच्या शरीरात भिनलेला व्यसनाच्या पदार्थाचा, द्रवाचा, रसायनाचा किंवा तत्सम गोष्टींचा अंश शरीरातून नाहीसा करणे, ही सर्वप्रथम महत्त्वाची गोष्ट असते. कौटुंबिक पाठबळ : व्यसनी व्यक्तींच्या कुटुंबीयांनी व्यसनी व्यक्तीशी कसे वागावे, काय सांगावे याबाबत मार्गदर्शन केल्यास अनेक व्यसनी व्यक्तींची व्यसने सुटू शकतात. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले.

## जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे गोदामपालाकडून धान्याचा सर्रास काळाबाजार

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा पुरवठा अधिकारी व तसेच तपासणी अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे मंठा येथील शासकीय गोदामातील गोदामपाल मारोती खोकले हे गोदामात साठवून ठेवलेल्या धान्याचा काळाबाजार करीत असून जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे. मागील दोन-तीन महिन्यापूर्वी रुजू झालेल्या गोदाम पाल मारोती खोकले यांनी रेशनचा काळाबाजार करणाऱ्या माफीयांना हाताशी धरून त्यांच्याकडून अर्थपूर्ण हितसंबंध जोपासून गोदामातील स्वस्त धान्याचा काळाबाजार करण्याचा सपाटा



लावला आहे. यामध्ये काही स्वस्त धान्य दुकानदार सुद्धा सहभागी असल्याची चर्चा आहे. मंठा शहरात रेशनचा काळाबाजार करणाऱ्या माफीयांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी रेशनचा काळाबाजार करणाऱ्या गोदामपाल खोकले यांच्यावर कारवाईची मागणी नागरिकांनी केली आहे. ग्रामीण भागात अनेक कार्डधारकांचे बोटांचे ठसे स्वाईप होत नसल्यामुळे अशा अनेक कार्डधारकांचे रेशन गोदामपाल खोकले हे परस्पर काळ्या बाजारात विकत असून त्यामुळे अनेक कार्डधारकांना रेशन पासून वंचित राहावे लागत आहे.

## पान ६ वरून...

### ओला दुष्काळ जाहीर

जाणून घेतली. अनेक ठिकाणी स्वतः चिखल तुडवत पाण्याच्या प्रवाहातून पायी चालत पाहणी केली. तसेच मंगळवारी परळी वैजनाथ तालुक्यातील आणि डोंगर पट्ट्यातील गावोगावी जाऊन भेटी दिल्या, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. तेथील नागरिक, शेतकऱ्यांना दिलासा दिला. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसह तरूण, मुलांशीही संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. या पाहणी वेळी देशमुख यांनी अनेकांच्या शेतातील बांध फुटल्यामुळे मोठ्या प्रमाणात माती वाहून गेली आहे. मांजरा, जायकवाडी सारखी मोठी धरणे भरल्याने सतत दरवाजे उघडण्यात आले, अतिवृष्टीमुळे पाझर तलाव व साठवण तलाव भरून फुटले, नद्यांनी पातळी सोडून त्या पात्राबाहेर पडल्यामुळे ते पाणी शेतांमध्ये शिरले. उभी पिके वाहून गेली, शेत जमीनीची माती खरवडून गेली आहे. त्यामुळे अंबाजोगाई तालुक्यातील मांजरा नदी काठावरील देवळा, अकोला, तडोळा, धानोरा (खुर्द), तटबोरगाव, माकेगाव, आपेगाव, अंजनपूर, कोपरा, बनसारोळा आदी गावांतील सरसकट पंचनामे करून यातून कोणालाही न वगळण्याची विनंती त्यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांना केली आहे. ही परिस्थिती पाहता ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ प्रति हेक्टरी ५० हजार रूपये नुकसान भरपाई द्यावी, आर्थिक मदत करावी अशी मागणी राजेसाहेब देशमुख यांनी केली आहे. यावेळी त्यांच्यासोबत शिवसेना उबाठा पक्षाचे नेते मदनलाल परदेशी, अच्युत ढगे, प्रविण देशमुख, केशव नाना ढगे, प्रविण पापा सोमवंशी, दिलीप ढगे, अतुल देशमुख, अस्लम भाई, डॉ.अजय ठोंबरे, बाळासाहेब ढगे, शिवनारायण ढगे, मुस्तफा सय्यद ताहेर पठाण हे पाहणी वेळी उपस्थित होते.

--------------

### दांडिया उत्सव म्हणजे

गटनेते अजय मुंडे, दिव्यांनी कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे, माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, कोलूघाणा सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष सुरेश लांडगे, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे सचिव प्रा मधुकर शिंदे, छगन आप्पा क्षीरसागर, तुळशीदास सालमोटे, अशोक बेंडे यांच्यासह दांडिया उत्सव समितीचे अध्यक्ष पवन फुटके, सोमनाथ वाघमारे, अशोक रोकडे, संदेश क्षीरसागर, राजकुमार भाग्यवंत, मोहन राजमाने, शिवशंकर जठार, मल्लिकार्जुन साखरे, रवी अन्नपूर्णे, गजानन बेंडे, ईश्वर राऊत, सचिन लासे, प्रसाद जठार,प्रदीप पिंपळे, ओमकार नाईक, शंकर कौले, ओमकुमार सोनटक्के आदि पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाला समाजातील मान्यवर, महिला व तरुणांचा मोठा उत्स्फूर्त सहभाग लाभला. रंगतदार दांडियाच्या तालावर वातावरण उत्साहाने भरून गेले.

--------------

### तब्बल ४० गुन्हे असलेला कुख्यात

फौजफाट्यासह सापळा रचून त्याच्या मुसक्या आवळल्या.ही कामगिरी आष्टी पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर,सहायक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे, पोलीस हवालदार प्रवीण क्षीरसागर, मजरूद्दीन सय्यद, विकास जाधव, अशोक तांबे,बब्रुवाण वाणी, नागेश लोमटे,संतोष दराडे,सजगणे, होमगार्ड यांनी केली.

--------------

### नारी शक्तीचा सन्मान करणारा

शक्तीचा तिला अंदाज येऊ दिला नाही. त्यामुळे स्त्रियांना कायम दुय्यम दर्जा दिला गेलेला आहे. परंतु, या देशामध्ये अनेक महापुरूषांनी अनेक रणरागिनींनी स्त्रियांना गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करून त्यांच्यामधील असलेल्या शक्तीचा जाणीव त्यांना करून दिले त्यामुळे स्त्रिया पुरूषांपेक्षा तरसुभरी कमी नसतात. उलट काकणभर सरसच असतात हे स्त्रियांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वाने कर्तबगारिने जगाला वेळोवेळी दाखवून दिलेले आहे. समस्त नारी समुदायाने आपल्यातील या ताकदीचा, ऊर्जेचा उपयोग करून घेऊन स्वतःला,आपल्या कुटुंबाला, सशक्त बनवावे , राष्ट्राला सशक्त बनवावे ही अपेक्षा व्यक्त करतो असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करीत असताना डॉ.चंद्रकांत चव्हाण यांनी नारी ही अबला नसून सबला आहे आणि नारी शक्तीचे सबलीकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रात सशक्त नारी स्वस्त परिवार हा उपक्रम राबविला आहे या उपक्रमामुळे स्त्रियांना आपल्या आरोग्याचा समतोल राखण्यासाठी मदत होणार आहे आणि स्त्री निरोगी राहिली तर तिचे मूल आणि कुटुंबीय स्वस्थ राहतील असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री भांगे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रशांत शिंदे यांनी मानले.

--------------

### महाएल्गार मेळाव्यास केज

शेंडगे, आ. गोपीचंद पडळकर, मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड, वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओबीसी आरक्षण अखंडित राहावे, ओबीसींच्या लेकरांना आरक्षणाचा लाभ मिळावा, ओबीसी समाजातील लेकरांच्या भवितव्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सदरील महाएल्गार मेळावा होणार असून बीड जिल्ह्यातून लाखो ओबीसी बांधव या मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत. केज तालुक्यातून देखील दहा हजारापेक्षा जास्त ओबीसी समाज बांधव या मेळाव्यास उपस्थित राहतील अशी ग्वाही कानडी माळीचे सरपंच अशोक राऊत यांनी यावेळी दिली.या बैठकीस कानडी माळी येथील उपसरपंच बाबासाहेब राऊत, माजी सरपंच महादेव कटारे, माजी सरपंच अमर राऊत, सचिन राऊत, माजी सरपंच रावसाहेब राऊत, सचिन राऊत, चिंचोली माळी येथील राम मेजर राऊत, माजी सरपंच भगवान काळे, माजी पं.स. सभापती नारायण शिंदे, आरुण काळे, धिरज वणवे, ञिंबक सारुक, बापु लिगडे, अभिजित राऊत यांच्यासह केज तालुक्यातील ओबीसी संघटनांचे पदाधिकारी, समाज बांधव आणि समता सैनिक आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

--------------

### माजलगावात अखिल भारतीय

मार्गदर्शनाखाली नवनाथ गायकवाड, नारायण मेंडके, बाबासाहेब जाधव, शिवाजी गायकवाड, हिरालाल जाधव, अविनाश गायकवाड,दिलीप जाधव,रामेश्वर मेंडके,अंकुश मेंडके,योगेश गायकवाड,विजय पवार,कृष्णा गायकवाड,बालाजी गायकवाड,रोहिदास पवार व अखिल भारतीय कैकाडी महासंघाच्या वतीने तहसील समोर धरणे आंदोलन सुरू केले आहेत.

--------------

### पिके सडली, नदीकाठी

पिंपळवाडी, दत्तनगर, बेलखंडी, नागझरी, शिरापूर गात, शिरूर, आर्वी, नवगण राजुरी येथील व्यापारी व आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांची संवाद साधला. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, बीड जिल्ह्यात दहा दिवसातून किमान पाच दिवस अतिवृष्टी झाली आहे. शिरूर तालुक्यातून वाहणारी सिंदफणा, पाटोदा तालुक्यातून वाहणारी मांजरा नदीने रौद्ररूप धारण केले होते. नदीकाठी असलेल्या गावात पाणी शिरले. शेतातील पिके, जमीन, विहीरी डोळ्यादेखत वाहून गेल्या. कधी नव्हे इतके पाणी नागरिकांनी पाहिले. जिल्ह्यात जवळपास साडेतीनशे कोटींचे शासकिय मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. तर शेतकऱ्यांचे, व्यापाऱ्यांचे नुकसान किती असेल, याचा अंदाज येत नाही.यामुळे सरकारने पंचनामे करत बसण्यापेक्षा ओला दुष्काळ जाहिर करून सरसकट मदत करावी, अशी मागणीही खा.बजरंग सोनवणे यांनी केली.

----------

## पान १ वरून...

### पंकजा मुंडेंनी बैलगाडीतून

पुन्हा अतिवृष्टी झाली, त्यामुळे तातडीने त्या जिल्हयात दाखल झाल्या. सकाळी पालकमंत्री असलेल्या जालन्यात पाहणी केल्यानंतर दुपारी त्या गेवराई तालुक्यातील धोंडराई येथे आल्या, इथे बैलगाडीतून त्यांनी नुकसानीची पाहणी केली. आमदार विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन तसेच सर्व प्रमुख अधिकारी त्यांचेसमवेत होते.

**हिरापूरमध्ये बांधावर घेतला भाजी भाकरीचा आस्वाद**

सिंदफणा नदीला आलेल्या पुराचे पाणी हिरापूर परिसरातील शेतात घुसल्याने उभ्या पिकांची नासाडी झाली. ना. पंकजाताईंनी दुपारी शेताच्या बांधावर जावून नुकसानीची पाहणी केली. पाहणी दौऱ्यानंतर एका शेतात शेतकऱ्यां समवेत बांधावरच भाजी भाकरीचा त्यांनी आस्वाद घेतला. ना. पंकजाताईंनी ब्रह्मनाथ येळंब येथे जि.प. शाळेत विस्थापित केलेल्या नुकसानग्रस्तांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. सॅनेटिरी नॅपकिन पासून ते पेन किलर पर्यंत सर्व जीवनावश्यक वस्तू पुरविण्याचे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले. नांदेवली, शिरूर कासार, मानूर तसेच पाथर्डी तालुक्यातील (जि. अहिल्यानगर) मालेवाडी, मुंगूसवाडे, कीर्तनवाडी आदी ठिकाणीही नुकसानीची पाहणी केली.

**मुख्यमंत्र्यांशी चर्चा ; अधिकची मदत मिळवून देऊ**

गेल्या १७ सप्टेंबर पासून मी अतिवृष्टीचा दौरा करत आहे. परळीत ममदापूर, पोहनेर मध्ये गेले, त्यानंतर पाटोदा तालुक्यात भाकरे वस्ती, वैद्यकिन्हीला पाहणी केली, कलेक्टर ऑफिसमध्ये आढावा घेतला, त्यानंतर मुंबईत जाऊन कॅबिनेट मध्ये मुख्यमंत्री व दोन्ही उप मुख्यमंत्र्यांशी यावर चर्चा केली. जिल्हयात खूप जास्त नुकसान झाले आहे, जमीनी खरडून गेल्या आहेत, जिल्हयाला जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी मी प्रयत्न करत आहे असे ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

--------------

### कंकालेश्वर मंदिरासाठी ९ कोटी

मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली. या संदर्भातील शासन निर्णय सांस्कृतिक व पर्यटन पर्यटन विभागाने आज जारी केला आहे.संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. कंकालेश्वर मंदिर हे बीड शहरातील एक प्राचीन आणि भव्य शिवमंदिर आहे.वास्तुशैलीवरून ते १० व्या ते १२व्या शतकादरम्यान (सुमारे १००० वर्षे जुने) बांधले गेले असावे असे मानले जाते.ते बीडच्या ऐतिहासिक वारशाचे एक प्रमुख प्रतीक मानले जाते आणि पर्यटकांसह भक्तांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. मंदिराची वास्तुकला, स्थान आणि धार्मिक महत्त्व यामुळे ते विशेष ओळखले जाते.मंदिराच्या बाह्यभागावरील शिल्पकला ही मराठवाड्यातील प्राचीन वास्तुकलेचे उत्तम उदाहरण आहे. महाशिवरात्री आणि श्रावण महिन्यात या मंदिरात हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. मंदिराचे हे महत्त्व लक्षात घेऊन त्याचे जतन आणि संवर्धन करण्याची मागणी अनेक दिवसांपासून लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संघटनांकडून होत होती. त्याची दखल घेऊन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या पुढाकाराने हा विषय अखेर मार्गी लागला असून आज त्या संदर्भातील शासन निर्णय जारी झाला आहे.

---------

### जालन्यात धनगर समाजाचा

बाळूमामाच्या नावानं चांगभलं..., बिरोबाच्या नावानं चांगभलं. ..! राष्ट्रमाता जिजाऊ मॉ साहेबांचा विजय असो, छत्रपती शिवाजी महाराज की जय ..,राष्ट्रमाता, महाराणी अहिल्यादेवी होळकरांचा विजय असो,,, राजे मल्हार राव होळकरांचा विजय असो, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो.., आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं...! अशा घोषणा देऊन संपूर्ण शहर दणाणून सोडले. दुपारी पावणेदोन वाजता दिपक बोऱ्हाडे यांचे व्यासपीठावर आगमन झाले. अंबड चौफुलीवर चारही बाजूने धनगर समाज बांधवांच्या गर्दीने रस्ते जाम झाले होते. इमारती, दुकानांवर चढून समाज बांधव तरुणांनी ऐतिहासिक सोहळा आपल्या डोळ्यात साठवला. समोर इंदौर येथील होळकर घराण्याचे वंशज भूषणसिंह राजे होळकर, आ.गोपीचंद पडळकर ,प्रकाश शेंडगे, डॉ. यशपाल भिंगे, शशिकांत तरंगे, बाळासाहेब किसवे, अभिमन्यू खोतकर , अक्षय गोरंट्याल, दादासाहेब काळे, यांच्यासह मान्यवर आणि महिला, विद्यार्थी, युवक व समाज बांधवांची लाखोंच्या संख्येने उपस्थिती होती. दीपक बोऱ्हाडे यांनी यावेळी मार्गदर्शन करतांना संविधानाने दिलेल्या अमृता पासून धनगर समाजाला ७५ वर्षे राज्यकर्त्यांनी वंचित ठेवलं. आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी पंढरपूर , छत्रपती संभाजीनगर , मंत्रालयासह राज्यभरात झालेली आंदोलने, उपोषणे, ना. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी शब्द दिला मात्र आदिवासी समाजबांधवांनी दबाव आणल्यामुळे जीआर निघू शकला नाही, अशी माहिती दिली. मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर हैदराबाद गॅझेट चा जी. आर. निघाला. हीच संधी हेरत आपण आंदोलन उभे केले असून समाजाने आपल्यावर विश्वास दाखवला हे आंदोलन विकणार नाही अशी जाहीर भूमिका बोऱ्हाडे यांनी स्पष्ट केली. आंदोलनास आलेल्या लाखो समाज बांधवांसमोर नतमस्तक होत तुमच्यामुळे आपल्याला बळ मिळाले असून पुढील पंधरा दिवस उपोषण चालू ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले. भूषण सिंह राजे होळकर यांनी दीपक बोऱ्हाडे यांचे आंदोलन हे राजकीय नसून समाजासाठीच आहे असे सांगत आभार मानले.

----------

### लक्ष्मण हाकेंच्या सहकाऱ्यावर

कार पेटवून दिल्याच्या घटनेनंतर लक्ष्मण हाकेंच्या सहका-यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला.मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मण हाके यांचे सहकारी पवन कंवर हे त्यांच्या इतर साथीदारांसोबत सावरगावजवळील एका ढाब्यावर जेवण करण्यासाठी थांबले होते. त्याच वेळी ३५-४० तरुणांनी त्यांच्यावर लाथा-बुक्क्या आणि काठ्यांनी हल्ला केला. माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी आले. त्यांनी जखमींना माजलगाव येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. चौघांनाही करण्यात आलेल्या बेदम मारहाणीत पवन कंवर गंभीर जखमी झाले. त्यांच्या डोक्याला, पायाला आणि हातालाही इजा झाली आहे.

**लक्ष्मण हाके काय म्हणाले?**

जवळच्या सहकाऱ्यावर झालेल्या हल्ल्यानंतर लक्ष्मण हाके यांनी संताप व्यक्त केला आहे. पवन करवर यांच्यावर जातीयवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध, अशी प्रतिक्रिया हाके यांनी दिली आहे.

------------

### आ.धस यांनी माडल्या मंत्री विखे

या सर्व नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. आष्टी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे, घरांचे, गावचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, खडकत येथील सीना नदीला पूर आल्याने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या व्यथा मंत्री विखे पाटील यांचे समोर आणल्या यावेळी ना.विखे पाटील म्हणाले, ''मी तुमच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठीच इथे आलो आहे.मी एक-दोन ठिकाणी जात असलो तरी त्यामुळे संपूर्ण तालुक्यातील यंत्रणा कामाला लागेल. सरकारी यंत्रणेकडून कोणी चुकलं असेल तर आता ते कामाला लागेल.तुमचा रोष असणं साहजिक आहे, कारण ज्याचं जळतं त्याला कळतं.तुम्ही व्यथा मांडत आहात,आणि तुमची चिंता योग्य आहे.मात्र, तुमच्या तालुक्यातील आणि गावातील एकाही गुंठ्याचा पंचनामा राहणार नाही, याची मी हमी देत असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी आमदार सुरेश धस यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त करत सांगितले की, आष्टी व कर्जत जामखेड तालुक्याच्या हद्दीत असलेल्या मौजे खडकत येथे कोल्हापूर पद्धतीच्या बांधऱ्याचा भराव फूटून शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचा आढावा घेत माहिती दिली.आष्टी मतदार संघातील जलसंपदा विभागाचे धिर्डी, निमगाव चो.,हिंगणी, टाकळसिंग, सांगवी, आष्टी, खडकत को. प. बंधारा यांसह इतर साठवण तलाव, मध्यम प्रकल्प व कालव्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत सविस्तर माहिती दिली.आपल्या विभागाच्या माध्यमातून तातडीने दुरुस्ती करून रब्बी हंगामासाठी पाणी साठवण्याची विशेष आर्थिक तरतूद करण्याची विनंती केली. ''मेंढरं, गुरं वाहून गेली असतील किंवा ज्या घरांची पडझड झाली असेल त्यासाठी नुकसानभरपाई दिली जाईल.ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यातील पंचनाम्यांचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.महसूल आणि कृषी विभाग काम करत आहेत.त्यामुळे काळजी करु नका,तुम्हाला मदत मिळेल. नुकसान भरपाई देण्याचे काम सुरु आहे आणि कोणताही शेतकरी किंवा गावकरी मदती पासून वंचित राहणार नाही याची खबरदारी मी लोकप्रतिनिधी म्हणून माझी असल्याचे आ.धस यांनी सांगितले. यावेळी गणेश शिंदे,माजी सभापती दत्ता जेवे, , भाजपा तालुकाध्यक्ष रमेश गावडे,शांतिलाल काटे,ललित जेवे,बाळासाहेब पवार,प्रदीप मोरे ,बाळासाहेब भोष्टे, संदीप खेडकर सरपंच ,विनोद खेडकर,प्रवीण झांभरे ,संजय पवार,संजय जेवे, ज्ञानेश्वर भोसले मेजर,निशांत जेवे,गणेश जेवे यांच्यासह या प्रसंगी जलसंपदा विभाग, बीडचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप अभियंता खडकत, टाकळसिंग, हिंगणी, सांगवी, आष्टी येथील शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

------------

### हेक्टरी ५० हजार रुपये

पाटील, आमदार प्रवीण स्वामी यांच्या समवेत धाराशिव लोकसभा मतदार संघातील अतिवृष्टीमुळे बाधीत शेतकरी होते. २४ सप्टेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अतिवृष्टी भागातील पाहणी दौ-यावर आहेत. धाराशिव लोकसभा मतदार संघात ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील आणि आमदार प्रवीण स्वामी यांच्या शिष्टमंडळाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन शेतक-यांसाठी विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. या नुकसानीची पाहणी करून त्वरित 'ओला दुष्काळ' जाहीर करावा, अशी प्रमुख मागणी त्यांनी केली आहे.

-----------

### सौर 'समृध्दी' देणारा देशातील

असून, याचा दर ३.०५ रुपये प्रति युनिट ठरवण्यात आला आहे.या सौर प्रकल्पांमुळे महामार्गासाठी एक नवा महसूल स्रोत निर्माण होणार आहे. टोलशुल्काव्यतिरिक्त सौरऊर्जेच्या विक्रीतून होणारा उत्पन्नाचा फायदा 'एमएसआरडीसी'ला मिळेल. यामुळे महामार्गाच्या देखभालीसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध होईल. तसेच, या प्रकल्पांमुळे हरित ऊर्जा निर्माण होणार असून, कार्बन उत्सर्जन कमी करण्यास मदत होणार आहे. भविष्यात इतर इंटरचेंजवरही असेच सौर प्रकल्प उभारण्याचा मानस 'एमएसआरडीसी'ने व्यक्त केला आहे.समृद्धी महामार्गावर सुरू झालेली सौरऊर्जा निर्मिती ही केवळ तांत्रिक प्रगती नाही, तर पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाकडे टाकलेलं एक मोठं पाऊल आहे. यामुळे महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांचा देशपातळीवर वेगळा आदर्श निर्माण झाला आहे. सौरऊर्जेसारख्या स्वच्छ आणि नवीनीकरणीय ऊर्जेचा वापर करून महामार्ग व्यवस्थापनात स्वत:चा आर्थिक व पर्यावरणीय फायदा साधणं ही काळाची गरज आहे. समृद्धी महामार्गाने त्याची यशस्वी सुरुवात केली आहे.

-------------

cmyk

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. २४ सप्टेंबर २०२५



## थोडक्यात...



### ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून पिके उद्ध्वस्त झाली आहेत. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने माजलगाव तहसील कार्यालयात निवेदन देऊन तालुक्यास तातडीने ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करण्यात आली. या निवेदनात शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत, पीकविमा रक्कम त्वरित वितरित करणे, कर्जमाफी, वीजबिल सवलत व जनावरांसाठी चारा-पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.निवेदनावर धम्मानंद साळवे (बीड जिल्हा सल्लागार), अंकुश जाधव (जिल्हा कोषाध्यक्ष), अशोक पोळ (तालुका अध्यक्ष), शत्रुघ्न कसबे (जिल्हा युवक प्रसिद्धी प्रमुख), युवा नेते राजरत्न खळगे, सिद्धार्थ साळवे, महादेव उघडे, राहुल साळवे, नवनाथ साळवे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### दिलीप खांडे यांना पितृशोक

बीड । प्रतिनिधी



बीड शहरातील मसरतनगर जिजामाता चौक भागात राहणारे सामाजिक कार्यकर्ते दिलीप खांडे यांचे वडील कोंडीबा राजाराम खांडे यांचे वृद्धापकाळाने बुधवार दिनांक २५ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८४ वर्षे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा सून, नातवंडे असा परिवार आहे.

मूळचे बीड तालुक्यातील म्हाळसापूर येथील रहीवाशी आणि सध्या मसरत नगर जिजामाता चौक भागात राहणारे सामाजिक कार्यकर्ते दिलीप खांडे यांचे वडील कोंडीबा राजाराम खांडे गेल्या काही दिवसापासून आजारी होते. त्यांचे बुधवार दिनांक २५ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्यावर बीड येथील मोंढा भागातील स्मशानभूमीत सायंकाळी ५ वाजता अत्यंत शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय क्षेत्रातील मान्यवर ,सामाजिक कार्यकर्ते ,मित्रपरिवार नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिलीप खांडे यांच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

### ज्येष्ठ पत्रकार बाबा देशमाने यांना पितृशोक



माजलगाव : मौजे चाटगाव, ता. धारुर येथील प्रतिष्ठित नागरिक श्रीहरी संतोबा देशमाने (वय ७०) यांची मंगळवार, दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ६ वाजता दीर्घ आजाराने प्राणज्योत मालवली. परिसरात अतिशय मनमिळाऊ आणि प्रेमळ व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्यावर अतिशय शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती होती. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मुंबई येथून प्रसिद्ध होत असलेल्या आरोग्यदूत मासिकाचे संपादक बाबा देशमाने यांचे ते वडील होते.

### सरसकट ५० हजार रुपये मदतीसह कर्जमाफी करा -होके पाटील

माजलगाव । प्रतिनिधी



अतिवृष्टीमुळे शेतकरी पूर्णपणे उध्वस्त झाला आहे त्यामुळे शासनाने पंचनाम्याची भाषा न करता सरसकट हेक्टरी ५० हजार रु मदतीसह शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी अशी मागणी माजलगाव तालुका काँग्रेसचे अध्यक्ष नारायण होके पाटील यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदनाद्वारे केली. यावेळी दिलेल्या निवेदनात ते म्हणाले कि मराठवाड्यात अतिवृष्टीने कहर केला आहे या अस्मानी संकटामुळे माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच कापूस, सोयाबीन सह पूर्ण खरिपाचे पीक पाण्याखाली गेलं आहे तर या पूर परिस्थितीमुळे नदीकाठी असलेल्या अनेक गावातील गोठ्यातील जनावरे, शेतीसाहित्या सह घरातील धान्य, संसारोपयोगी वस्तू सुध्दा वाहून गेल्याने शेतकरी अक्षरशः उध्वस्त झाला आहे. त्यामुळे शासनाने पंचनाम्याची भाषा न करता सरसकट हेक्टरी ५० हजार रु मदतीसह या अतिवृष्टीमुळे प्रचंड अडचणीत सापडलेल्या शेतकरी कर्जमाफीची हिच ती योग्य वेळ समजून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण कर्जमाफी कारावी. अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने तालुका अध्यक्ष नारायण होके पाटील यांनी केली.

### ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या लढाईसाठी बीडमध्ये मेळावा-डॉ.सोनकाटे

बीड । प्रतिनिधी



ओबीसी समाजाच्या न्याय व हक्कासाठी ओबीसी चे नेते आणि राज्याचे मंत्री छगनरावजी भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणाऱ्या बीड येथील ओबीसींच्या एल्गार मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डॉक्टर स्नेहलता सोनकाटे यांनी केले आहे.राज्यातील ओबीसी समाजावर आणि समाजाच्या आरक्षणावर अतिक्रमण होत आहे ते ठोकवण्यासाठी छगनरावजी भुजबळ यांनी पुढाकार घेतला आहे रविवार दिनांक २८ रोजी या ऐतिहासिक महाएल्गार रॅलीत नामदार छगनरावजी भुजबळ व अन्य ओबीसी नेते मार्गदर्शन करणार आहेत..तरी सर्व ओबीसी बांधवांनी लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन ओबीसी नेत्या डॉ.स्नेहाताई सोनकाटे यांनी केले आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना कार्य प्रसिद्धी सप्ताहाचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त दिनांक २२ सप्टेंबर २०२५ ते दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी कार्य प्रसिद्धी सप्तह आयोजन करण्यात आले या सप्ताहात महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ विश्वास कदम व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या सप्ताहाचे उद्घाटन २२ सप्टेंबर २०२५ रोजी राष्ट्रसंत गाडगे महाराज व भारतरत्न डॉ राधाकृष्ण यांच्या प्रतिमेचे पूजन करून उद्घाटन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ विश्वासराव कदम विनोद कीदरक आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्राध्यापक शिवाजीराव भोरे सर उपस्थित होते या सप्ताहा निमित्ताने महाविद्यालयात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले यामध्ये महाविद्यालयाचा आदर्श शिक्षक पुरस्कार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान वृक्षारोपण जलसंवर्धन प्लास्टिक निर्मूलन स्वच्छता मोहीम पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती जागतिक पर्यावरण दिन आरोग्य तपासणी विश्व पर्यटन दिन एतिहासिक स्थळाला भेट शहीद भगतसिंग जयंती निमित्त व्याख्यान जागतिक विश्व दिवसानिमित्त मधुमेह रक्तदाब संसर्गजन्य रोग इत्यादी विषयावर आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.

# जिल्ह्यात श्रमदानातून महास्वच्छता अभियान राबविणार

बीड । प्रतिनिधी

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि.२ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो आहे. त्यास अनुसरुन स्वच्छता ही सेवा २०२५ मोहिम दि. १७ सप्टेंबर ते दि. २ ऑक्टोबर या कालावधीत राबवण्यात येत आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने जिल्ह्यात गुरुवार दिनांक २५ सप्टेंबर रोजी महाश्रमदान अभियानाचे नियोजन देशभरात करण्यात आलेले आहे. एक दिवस,एक तास एक साथ, या श्रमदान उपक्रमात अतिवृष्टीमुळे साथ रोग पसरण्याची शक्यता असल्याने पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत, सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता होणे अत्यंत गरजेचे आहे . रोगराई पसरू शकते अशा ठिकाणी लोकसहभागातून श्रमदानातून स्वच्छता करण्यासाठी ग्रामस्थानी सहभाग घ्यावा असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी




जितीन रहमान यांनी केले आहे.

या वर्षीच्या स्वच्छता ही सेवा २०२५ साठी स्वच्छोत्सव ही थीम निश्चित केली आहे. खालील प्रमाणे उपक्रम राबविण्यात येणार आहे.

✲ दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी स्वच्छता ही सेवा मोहीमेचा शुभारंभ तालुकास्तर व गावस्तरावर परिसर स्वच्छतेचा उपक्रम राबवुन करण्यात आला आहे.

अस्वच्छ ठिकाणांची निवड करुन सदर ठिकाणांची मॅपिंग करून त्या ठिकाणाची साफ़सफ़ाई करण्यात येत आहे. एक दिवस, एक तास, एक साथ - या महास्वच्छता उपक्रमां अंतर्गत दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी देशव्यापी श्रमदान आयोजित करण्यात येणार असुन, या उपक्रमात जिल्यातील सर्व गाव स्तरावरील सर्व घटकांना सहभागी करुन मोठ्या स्वरुपाचा उपक्रम राबविण्यात येणार आहे.अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली आहे. स्वच्छता ही सेवा २०२५ अनुषंगाने महास्वच्छता जिल्हयातील सर्व गावांमध्ये गुरुवार दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेतमहास्वच्छता अभियान राबविणेत येणार आहे. या मोहिमेत ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी, महिला, बचत गट प्रतिनिधी, शासकीय कर्मचारी, युवक यांचा सहभाग घेण्यात येणार आहे. महा स्वच्छता अभियानामध्ये विविध उपक्रम घेणेत येणार आहेत

गावातील शाळा, अंगणवाडी, शासकीय कार्यालय ठिकाणांची स्वच्छता करणेत येणार आहे.

महास्वच्छता अभियान उपक्रमासाठी झाडू, कचराकुंड्या, थैल्या, हातमोजे, मास्क, सॅनिटायझर, फावडे, घमेली इ. साहित्य व घंटागाडी उपलब्ध करणेत याव्यात तसेच गोळा होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थितरीत्या विल्हेवाट लावणेत यावी. अशा ग्रामपंचायतींना सूचना देण्यात आलेले आहेत.

> महास्वच्छता अभियान राबविणेसाठी गावपातळीवर व्हॅट्स अँप ग्रुप . दवंडी व नोटीस देऊन गावामध्ये सर्व दर्शनी भागात फेल्क्स लावून महा स्वच्छता अभियानाची प्रसिद्धी व जनजागृती करावी. महा स्वच्छता अभियानात जास्तीत जास्त लोकांचा सहभाग राहील तसेच अती पावसामुळे ज्या ज्या ठिकाणी अस्वच्छता झालेली आहे त्या जागा स्वच्छ होणे गरजेचे आहे. जर काळजी घेतली नाही तर साथीचे आजार पसरण्याची शक्यता आहे. सर्व ग्रामपंचायतीनी ग्राम पाणीपुरवठा स्वच्छता समिती सदस्यांसह श्रमदानाचे नियोजन करावे. आणि स्वच्छता करावी.
>
> **-जितिन रहमान,**
> मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड

## महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणाचा पाया सावित्रीमाई महिला पतसंस्थेच्या माध्यमातून रचला जात आहे - अध्यक्षा सुनीता मोदी

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून शहरातील महिलांच्या आर्थिक सशक्तीकरनाचा पाया रचला जात आहे. दैनंदिन जीवनात महिलांची आर्थिक उन्नती होऊन त्यांचे जीवनमान उंचावत असल्याचा आनंद क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. सुनीता राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला. त्या पतसंस्थेच्या सन २०२४-२०२५ सालच्या १० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेचा आर्थिक अहवाल सादर करत होत्या. यावेळी पतसंस्थेच्या सचिव खडकभावी शोभा बाबू , तसेच उपाध्यक्षा डॉ. धाकडे राजश्री राहुल , मसने उषा गणेश, मस्के अंजली विष्णुपंत , सविता विजय



रापतवार , सरवदे संगीता विष्णू, फारोखी परवीन नुजहत , खंडाळे सुरेखा बाबुराव, चोकडा जमुना जयप्रकाश , रुपाली सुधीर धर्मपात्रे, सायली सुहास मोहिते या संचालिकांसह शाखा व्यस्थापक सागर कंगळे हे उपस्थित होते.

पतसंस्थेच्या २०२४-२५ सालच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुरुवात अंबाजोगाई वासीयांचे आराध्यदैवत श्री योगेश्वरी देवी तसेच सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर पतसंस्थेचे व्यवस्थापक सागर कंगळे यांनी संस्थेच्या मागील वर्षाचा इतिवृत्त सादर केला. ज्यामध्ये संस्थेच्या आर्थिक वर्षातील विविध विषयांवर चर्चा घेवून त्यांना मान्यता मिळवली. तसेच मा अध्यक्षांच्या अनुमतीने ऐनवेळी आलेल्या विषयांवर चर्चा करण्यात आली. पतसंस्थेचा वार्षिक अहवाल अध्यक्षा सौ. सुनीता राजकिशोर मोदी यांनी सादर केला . आपल्या देशाची संस्कृती ही पुरुष प्रधान संस्कृती आहे . यामुळे समाजात बहुतांश वेळी महिलांना दुय्यम स्थान देताना दिसून येत आहे. याचाच परिणाम म्हणून बहुतांश महिला घर, चूल आणि मूल यामध्येच गुरफटून पडलेली आढळून येत असते. कुटुंबात तसेच दैनंदिन व्यवहारात महिलांना आर्थिक स्वायत्तता नसते. हीच बाब हेरून साधारणपणे १० वर्षा पूर्वी राजकिशोर मोदी व सौ सुनीता मोदी यांनी केवळ महिलांनी महिलांसाठीच चालवावी अशा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला पतसंस्थेची मुहूर्तमेढ रोवली. या पतसंस्थेमुळे महिलांना काही प्रमाणात का होईना आर्थिक स्वायत्तता मिळून त्यांचा व कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावत असल्याचे दिसून आले.

## पाटोद्यात आभाळ फाटले! शंभरावर कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात रविवारी मध्यरात्री झालेल्या मुसळधार पावसाने पाटोद्यात हाहाकार माजवला. आभाळ फाटल्यासारख्या पावसामुळे गावातील रस्ते, गल्लीबोळ नदीसारखे वाहू लागले. घरं, दुकाने, गोदामांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे लाखोंचे नुकसान झाले.पावसाच्या पाण्याच्या प्रचंड लोंढ्याने गाड्या, जनावरे वाहून गेली. नागरिकांचे संसार उघड्यावर आले असून शंभरावरून अधिक कुटुंबे बेघर झाली आहेत. या कुटुंबांना खायला अन्न नाही, बसायला जागा नाही अशी भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे.गावातील शाळा, मंदिर परिसरात पाणीच पाणी असल्याने पीडित कुटुंबे उघड्यावर थांबलेली दिसत आहेत. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व महिलांची गैरसोय होत आहे. पाण्यामुळे वीजपुरवठाही विस्कळीत झाला असून गाव अंधारात बुडाला आहे.दरम्यान, नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने मदत करण्याची मागणी केली आहे. तात्काळ निवारा, अन्न व औषधांची सोय करावी, अन्यथा परिस्थिती हाताबाहेर जाईल असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.प्रशासनाने घटनास्थळी तातडीने पथक पाठवून नुकसान ग्रस्तांचे सर्वेक्षण सुरू करावे, तसेच शासकीय यंत्रणेने बचाव व मदतकार्य त्वरीत सुरू करावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

## मांजरा पट्यातील शेतकऱ्यांना किराणा किटचे रमेश आडसकरांकडून वाटप



**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मांजरा पट्यातील राजेगाव , दैठणा , भोपला येथे झालेल्या अतिवृष्टिमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले, म्हैस, बैल, गाई वाहून गेले, घरामध्ये पाणी शिरले , गेली पंधरा दिवसापासून अतिवृष्टी झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे अशा शेतकऱ्यांना व मजुराच्या हाताला काम नाही अशाया सर्व नुकसानीचे पहानी करुण सर्वांना मदत स्वरूपात किराणा किट वाटप करण्यात आले. यावेळी रमेशराव आडसकर .ऋषिकेश भैय्यासाहेब आडसकर ,बाजार समितीचे सभापती अंकुशरावजी इंगळे, दिलीप आबा गुळभिले, ता. अध्यक्ष अमर भैय्या पाटील, शिवदास तात्या पाटील व सर्व सहकारी आणि शेतकरी बांधव होते.

## केंद्रप्रमुख चंद्रकांत उकांडे यांचा शुक्रवार रोजी अंमळनेर येथे सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील रहिवासी तथा आयएसओ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोतन येथे कार्यरत असलेले जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त चंद्रकांत रामचंद्र उकांडे सर केंद्रप्रमुख अंमळनेर हे शासकीय नियमानुसार वयोमानाप्रमाणे दि.३०/०९/२०२५ रोजी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत असून यानिमित्त शुक्रवार दि.२६/०९/२०२५ रोजी सकाळी १० वा. साई मंगल कार्यालय अंमळनेर येथे त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा आयोजित केला असून या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केंद्रप्रमुख,सर्व मुख्याध्यापक व शिक्षक वृंद केंद्र कन्या अंमळनेर,अध्यक्ष, सचिव व सदस्य शाळा व्यवस्थापन समिती अंतर्गत केंद्र कन्या अंमळनेर यांच्या वतीने करण्यात आले आहे.यावेळी शुभाशिर्वाद



गुरुवर्य महंत स्वामी महादेवानंद भारती महाराज श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी यांचे लाभणार आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार सुरेश धस तसेच प्रमुख अतिथी माजी आमदार बाळासाहेब आजबे, माजी आमदार भीमराव धोंडे,माजी जिल्हा परिषद सदस्य माऊली आप्पा जरांगे,युवा नेते भाऊसाहेब भवर व प्रमुख उपस्थिती नागनाथ शिंदे शिक्षण अधिकारी प्रा.जि. प.लातूर, आबासाहेब घायाळ मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.बीड,शेख जमीर उपशिक्षणाधिकारी प्रा.जि.प.बीड,धनंजय बोंदार्डे गटशिक्षणाधिकारी पं.स.पाटोदा, प्रशांत शिंदे गटशिक्षणाधिकारी पं.स.शिरूर, हनुमंत गव्हाणे शिक्षण विस्तार अधिकारी पं.स.पाटोदा, श्रीमती सीमा काळे गटशिक्षण अधिकारी पं.स.आष्टी, ऋषिकेश शेळके शिक्षण विस्तार अधिकारी पं.स.पाटोदा, बाळासाहेब केकान कक्ष अधिकारी ग.शि.अ.पाटोदा, संदीप पवार सर राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक, विक्रांत हिंगे एपीआय अंमळनेर पो.स्टे,महेश खेंगरे सरपंच कोतन, कृष्णा चव्हाण पीएसआय अंमळनेर पो.स्टे,अशोक जेधे सरपंच गांधणवाडी,गोविंद गाडे सरपंच अंमळनेर,निलेश मोरे सरपंच पिंपळवंडी, राजेंद्र इथापे सरपंच पांढरवाडी,उद्धवशेठ पवार माजी सरपंच आदिसह विविध स्तरातील अधिकारी,पदाधिकारी,पत्रकार आदींची उपस्थिती लाभणार आहे.

## जिल्हास्तरीय शालेय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत जि.प.कन्या प्रशालेचे यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात नुकत्याच जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत शालेय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत जिल्हा परिषद कन्या प्रशालेतील विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेत जिल्हाभरातुन अनेक शाळा व शालेय विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त असा सहभाग नोंदवला होता.



खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय बॉल बॅडमिटन स्पर्धेत जि प कन्या प्रशाला अंबाजोगाईच्या १४ वर्षे वयोगट व १७ वर्षे वयोगटामधील मुलींच्या संघाने जिल्ह्यात सर्वद्वितीय येऊन यश संपादन केले आहे. या स्पर्धेमध्ये ग्रामीण भागासकट काळवटी तांडा, परळीवेस, रविवार पेठ येथील अत्यंत गरीब व होतकरू मुली सहभागी झाल्या होत्या . या विदयार्थीनींना कसल्याही प्रकारच्या शालेय क्रीडा सोयी सुविधा नसतांना तसेच अत्यंत अपुऱ्या खेळाच्या साहित्याच्या माध्यमातून खेळाडूंनी हे यश मिळवले आहे.

या स्पर्धेत सर्व सहभागी तसेच विजेत्या खेळाडूंना शाळेचे क्रीडा शिक्षक तथा तालुका क्रीडा समन्वयक दत्ता देवकते , श्रीमती कुलकर्णी मॅडम, श्रीमती जाधव यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या यशाबद्दल सर्व यशस्वी खेळाडूंचे गटशिक्षणाधिकारी मधुकर सुवर्णकार , शाळेचे मुख्याध्यापक एस जी चाटे , शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय दादा रापतवार ,सचिव विष्णू बप्पा सरवदे, व शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन करत पुढील विजयी स्पर्धकांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## घराचीभिंत पडून लाखोंचे नुकसान; एक जण जखमी

घाटसावळी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात सध्या अतिवृष्टी झाल्याने हापती गणित परिस्थिती निर्माण झालेली आहे यामध्ये बीड तालुक्यातील घाटसावळी त अतिवृष्टी पावसाने घराची भिंत पडून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे,



याबाबत अधिक माहिती अशी की घाटसावळी येथील अंगद सकाराम खवत ड यांच्या राहत्या घराची भिंत पडून संसार उपयोगी साहित्य धान्य व इतर वस्तूचे नुकसान झाले यामध्ये साईनाथ खवतड हा जखमी झाला असून उपचारासाठी खाजगी दवाखान्यात दाखल करण्यात आले असून या घटनेची माहिती मंडळाधिकारी बांगर साहेब तलाठी तलाठी आखाडे साहेब यांना कळल्यानंतर तात्काळ घटनास्थळी येऊन झालेल्या नुकसानीचा पंचनामा करण्यात आला यावेळी त्यांच्याकडून ग्रामस्थांना सावधान राहण्याची सांगण्यात आले.

## स्वस्थ नारी,सशक्त परिवार अभियान अंतर्गत दासखेड आरोग्य केंद्रात तपासणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र दासखेड येथे आज दि.२३ रोजी सकाळी शिबीर घेण्यात आले.या शिबिरात खालील प्रमाणे तपासणी करण्यात आली.

उच्च रक्तदाब ,रक्तातील साखर तपासणी करण्यात आली, गरोदर मातांची तपासणी व उपचार देण्यात आला मानसिक आरोग्य विषयी समुपदेशन करण्यात आले, अवयव दान या बद्दल माहिती देऊन जनजागृती करण्यात आली. दमा व इतर स्वशन विकाराविषयी माहिती देण्यात आली HIV विषयी समुपदेशन व माहिती देण्यात आली, लैंगिक आजार (स्त्री पुरुष) या विषयी समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात आले, मौखीक आजार माहिती व उपचार। देण्यात आले, जल जन्य आजार विषयी आरोग्य शिक्षण देण्यात आले, हिवताप( मलेरिया) विषयी माहिती व सल्ला देण्यात आला, किशोरवयीन( १३ ते १८ वयोगट ) मुलांचे व मुलींचे आरोग्याबाबत समुपदेशन व सल्ला देण्यात आला, क्षय रोग विषयी माहिती दिली व क्षय रोग टाळण्यासाठीच्या उपाय योजना सांगण्यात आल्या, लहान बालकामधील कुपोषण टाळण्यासाठी पोषक आहाराविषयी मार्गदर्श न करण्यात आले, योग शिबीर घेऊन शिबिराथीना योगाचे आयुष्यातील महत्व सांगण्यात आले, कुष्ठ रोग विषयी तपासणी व सल्ला देण्यात आला, दंत चिकित्सा, आभा कार्ड व आयुषमान शिबीर घेऊन आयुषमान लरीव काढण्यात आले, व्यसनमुक्ती विषयी समुपदेशन करण्यात आले मद्य पान धूम्रपा न नाचे दुस्परिणाम सांग यात आले तंबाकू गुटखा न खाण्याचा सल्ला देण्यात आला व समुपदेशन करण्यात आले,तरी यामध्ये दासखेड,सोनेगाव, पाचंग्री, आणि आसपासच्या परिसरातल्या गावातील नागरिकांनी याचा लाभ घेतला. तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नरेश कासट साहेब यानी आरोग्य शिबीराला भेट दिली व सर्व कर्मचारी यांना सुचना व चांगले काम करणाऱ्याची अभिनंदन केले. कर्मचारी यांनी पूर्णपने समर्पित भावनेने सेवा देण्याचा प्रयत्न केला. या शिबिराचे नियोजन प्राथमिक आरोग्य केंद्र दासखेड येथील वैद्यकिय अधिकारी डॉ शरयू पडोळे, डॉ युवराज राठोड, आरोग्य निरीक्षक सय्यद कादर ,-छ्च् मीनाज शेख, आरोग्य सहाय्यक राहुल चव्हाण ,औषध निर्माण अधिकारी गणेश मस्के ,प्रयोगशाळा तंत्रज्ञ प्रदीप गोरे कनिष्ठ लिपिक नितेश राख व गणेश सरडे ,शुभम राख,लक्ष्मण पवार अश्विनी सोनवणे व इतर कर्मचारी यांनी केले.या कार्यक्रमाला उपस्थित डॉ. सबा सय्यद (Dentist) , श्रीमती सोनसळे (Optometrist) ,RMO(स्पंदन हॉस्पिटॅल, बीड), आरोग्य मित्र बालासाहेब खळगे शुभम वाघमारे व आशा ताई यांनी उपस्थिती दाखवून रुग्णांची तपासणी केली.

cmyk


# शेतकऱ्यांनी नुकसानीचे फोटो पाठवू नयेत

## सरकारी अधिकारी बांधावर येऊन पंचनामे करतील; कृषीमंत्री दत्ता भरणेंचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर


राज्यात ज्या भागात नुकसान झाले आहे त्या ठिकाणी कर्ज वसुली थांबलीच पाहिजे. राज्य सरकार बँकांना तशा सूचना देईल. २,२१५ कोटी रुपये काल शासनाने जमा केले आहेत. अजून आकडे वाढत आहेत. ती सुद्धा मदत लगेच मिळेल. दिवाळीच्या आधी कुठलीही मदत राहणार नाही. मात्र कोणत्याही शेतकऱ्याने नुकसानीचे फोटो पाठवणे गरजेचे नाही. आमच्या विभागाचे कृषि आणि महसूलचे कर्मचारी स्वतः बांधावर जाऊन पंचनामे करतील. अशी महत्त्वाची माहिती राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. ते छत्रपती संभाजीनगर येथे बोलत होते.

राज्यात पावसामुळे खूप नुकसान झाले आहे. अनेक भागात अतिवृष्टी झाली असून यात शेतकऱ्यांच्या पिकांचेही मोठं नुकसान झालं आहे. जालनामध्ये २ लाख ५४ एकर क्षेत्रात नुकसान झाले आहे. या पावसाचा सर्वाधिक फटका नांदेडमध्ये बसला आहे. त्याचे पंचनामे युद्ध पातळीवर सुरू आहे. आज मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी करणार आहेत. नुकसान भरपाई लवकरच मिळेल, असा प्रयत्न सुरू आहे.असेही दत्तात्रय भरणे म्हणाले.दुसरीकडे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे पूरपरिस्थितीचा आढावा घेणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी २२१५ कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे. आतापर्यंत ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना ही मदत मंजूर झाली आहे. ही रक्कम येत्या ८ ते १० दिवसांत शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा होईल. स्थानिक प्रशासनाला याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य सरकार युद्धपातळीवर मदतकार्य करत असून, नुकसानीच्या निकषांमध्ये शिथिलता आणण्याचे आश्वासन दिले आहे. ''पुढच्या आठ ते दहा दिवसांमधे हे पैसे जे आहेत ते त्याठिकाणी आम्ही जमा करणार आहोत,'' असे सांगण्यात आले.



राज्यात मुसळधार पावसाचे थैमान सुरु असल्याने शेतकरी आणि विरोधकांकडून ओला दुष्काळ जाहीर करण्यात मागणी केली जात आहे. याबाबत विचारले असता कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, परिस्थितीचा अंदाज घेतला जात आहे. अजून पाऊस सुरुच आहे. सगळा विचार करून मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री याबाबत निर्णय घेतील. हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

## प्रभावी तण नियंत्रणाच्या योग्य पद्धती



पीक उत्पादनामध्ये मशागतीपासून तर काढणीपर्यंत तण नियंत्रण हा एक महत्वाचा घटक आहे. पीकानुसार वेगवेगळ्या प्रकारची तणे आढळतात. सद्यस्थितीमध्ये तणनाशके फवारली तरीही तण नियंत्रण होत नाही असे दिसत आहे अशावेळी तणनाशकांची फेरपालट करणे जरुरीचे ठरते. जशी आपण पिकाची फेरपालट करतो त्यामुळे मातीचा पोत उत्तम राहण्यास मदत होते. त्याचप्रमाणे तणनाशकांचा फेरपालटीत वापर केला तर तणांस अटकाव होऊ शकतो.

तण नियंत्रणामधील महत्त्वाचे घटक : जमिनीचा प्रकार. पाण्याची उपलब्धता. पिकांमधील अंतर आणि वाढीचा वेग. खत देण्याच्या पद्धती. मनुष्यबळाची उपलब्धता. पूर्वीचे आणि नंतरचे घेण्यात येणारे पिक. तणनाशका बद्दलचे ज्ञान आणि कुशलता.

तण नियंत्रणाचे प्रकार : पीक लागवडीच्या पद्धती – पिकांची फेरपालट, जोमाने वाढणाऱ्या पिकांची निवड, खत आणि पाणी देण्याच्या पद्धती.

यांत्रिकी – खुरपणी, कोळपणी, नांगरणी इत्यादी : तण नाशकांचा वापर : पेरणीपूर्वी, पेरणीनंतर परंतु पीक उगवण्यापूर्वी आणि पीक उगवल्यानंतर वापरण्यात येणारी तणनाशके. जैविक तण नियंत्रण : यामध्ये जैविक घटकांचा वापर करून तण नियंत्रण करू शकतो.

पिकातील तण नियंत्रणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कालावधी : सोयाबीन, मका, ज्वारी, बाजरी १५ ते ४५ दिवस. तूर आणि कापूस – १५ ते ९० दिवस. मूग आणि उडीद – पंधरा ते तीस दिवस. ऊस – तीस ते नव्वद दिवस. हळद आणि आले – तीस ते १२० दिवस.


तणनाशके फवारताना घ्यावयाची काळजी : प्रत्येक वेळी पंप स्वच्छ धुणे आवश्यक आहे. निवडक तणनाशकांचा वापर करताना मात्रा आणि वेळ महत्त्वाची. वाऱ्याची दिशा लक्षात घेऊन फवारणी करणे आवश्यक. पंपाची कार्यक्षमता तपासून तणनाशकांची मात्रा ठरवणे. तणनाशकांच्या फवारणीसाठी डब्ल्यू एफ एन नोझलचा वापर करावा.

अशा सर्व बाबींचा विचार करून तणनाशकांचा वापर केल्यास तणांवर नियंत्रण आणू शकतो. शक्यतो तणनाशक जेवढी मात्रा दिली आहे तेवढेच वापरावे, एकच तणनाशक पुन्हा पुन्हा एकाच पिकामध्ये वापरले तर त्या तणनाशकाने तण नियंत्रण काहीश्या प्रमाणात कमी होताना दिसते आहे यामध्ये आपण तणनाशकांची फेरपालट केली तर नियंत्रणासाठी त्याचा फायदा होऊ शकतो.

## म्हशींना खनिज मिश्रण खाऊ घालत असाल तर हे लक्षात ठेवा

सकाळ, दुपार आणि संध्याकाळच्या हवामानानुसार व वेळेनुसार जनावरांचा आहार ठरविला जातो. प्राण्यांसाठीही वेळेवर आणि संतुलित आहार निश्चित करण्यात आल्याचे पशुतज्ज्ञ सांगतात. ठरलेल्या डोसनुसार, जनावरांना कमी किंवा जास्त काहीही दिले जाऊ शकत नाही. कारण खाण्यात निष्काळजीपणामुळे जनावरे आजारी पडू शकतात. हिरव्या व सुक्या चाऱ्यासोबत खनिज मिश्रण जनावरांना दिल्यास त्याचे अनेक फायदे होतात. कारण प्राण्यांच्या अन्नाने त्याचे पोट भरतेच शिवाय उत्पादनही वाढते आणि त्याचे आरोग्यही चांगले राहते, असे प्राणीतज्ज्ञांचे मत आहे. कारण जनावरांना चारा आणि खनिज मिश्रण खायला देण्यात थोडीशी निष्काळजीपणाही महागात पडू शकतो. त्यामुळेच म्हशींच्या आहाराबाबत नुकताच एक अहवाल प्रसिद्ध झाला आहे. केंद्रीय म्हैस संशोधन संस्था, हिसार, हरियाणा यांनी हा अहवाल दिला आहे.

अहवालानुसार, म्हशींना चांगले पोषण देण्याबरोबरच, पशुपालकाने म्हशीला केव्हा आणि किती खनिज मिश्रण आणि चारा द्यायचा हे देखील जाणून घेतले पाहिजे. हा अहवाल विशेषतः अशा लोकांसाठी तयार करण्यात आला आहे जे प्राण्यांबद्दल काय विचार करतात, त्यांना काहीही खायला देतात आणि सर्वकाही पचते. मात्र असा विचार करणे चुकीचे असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.



म्हशींना चारा देताना या गोष्टी लक्षात ठेवा : म्हशींचा आहार संतुलित असावा. म्हशीचे अन्न चविष्ट व पौष्टिक असावे. जनावरांच्या खाद्याला दुर्गंधी येऊ नये. पोट पूर्ण भरल्यावरच म्हशीला समाधान मिळते. म्हशीला तिच्या वयानुसार अन्न द्यावे. म्हशीचा डोस अचानक बदलू नये. तज्ज्ञांच्या मते, म्हशींना चारा देण्याची वेळ निश्चित करा. म्हशींच्या आहाराच्या वेळेत वारंवार बदल करू नका. दोन खाण्याच्या वेळेत इतके अंतर नसावे की म्हशीला उपाशी राहावे लागेल. म्हशीचा आहार असा असावा की त्यामुळे पोटदुखी (बद्धकोष्ठता आणि जुलाब) होणार नाही. म्हशीचे पोट खूप मोठे असते, त्यामुळे तिला पुरेसा चारा द्यावा. आहारात शक्य तितक्या प्रकारच्या धान्यांचा आणि केकचा समावेश करा.


डोसमध्ये अधिक ग्रॅन्युलॅरिटीमुळे, मिश्रणाची गुणवत्ता आणि चव दोन्ही वाढते. म्हशीला भूक लागली की ती चिखल, चिंध्या आणि इतर घाणेरडे पदार्थ खाऊ लागते. आहारात समाविष्ट केलेले धान्य मिश्रण हे प्रथिने आणि उर्जेचे स्त्रोत असले पाहिजे. म्हशींना चारा आणि धान्याचे मिश्रण अशा प्रकारे खायला द्यावे. सीआयआरबीचे सेवानिवृत्त शास्त्रज्ञ डॉ. सज्जन सिंग सांगतात की, चाऱ्याचे मिश्रण चाऱ्यामध्ये चांगले मिसळून खायला दिल्यास कमी दर्जाच्या आणि कमी चवीच्या चाऱ्याचाही वापर वाढतो. त्यामुळे चाऱ्याची नासाडी होत नाही. कारण म्हशींना निवडक खाण्याच्या सवयीमुळे खाताना भरपूर चारा वाया जातो.धान्य दळून खायला देणे उपयोगाचे : म्हशींना धान्याचे मिश्रण खायला देण्यापूर्वी ते चांगले ग्राउंड करून घ्यावे, असे तज्ञांचे म्हणणे आहे. कारण संपूर्ण धान्याचे मिश्रण म्हशीला दिले तर ते शेणासोबत निघून जाते. त्यामुळे म्हशींना फक्त योग्य प्रकारे ग्राउंड धान्याचे मिश्रण खायला द्यावे. कारण खराब जमिनीतील धान्याचे मिश्रण म्हशीला पचवता येत नाही. धान्याचे मिश्रण म्हशीला खाण्यापूर्वी भिजवल्यास ते अधिक चवदार आणि पचायला लागते.

## आंब्याच्या अतिघन बागेत उत्तम बहरासाठीचे तंत्र

गेल्या वर्षीची फळे काढल्यानंतर बहुतेक शेतकऱ्यांनी योग्य पद्धतीने छाटणी केलेली आहे. त्यामुळे जूनमध्येच बागेमध्ये नवीन पालवी आली होती. या काळामध्ये जमिनीतील वाफसा व पावसाचा अंदाज पाहून जुलै अखेर ते ऑगस्टपर्यंत बहुतेक शेतकऱ्यांनी पॅक्लोब्युट्राझॉल या वाढनियंत्रकाचा वापरही केलेला आहे. सामान्यतः ऑगस्ट– सप्टेंबरमध्ये आंबा झाडांना नवीन पालवी मोठ्या प्रमाणात येते. मात्र गेल्या महिन्यातील बहुसंख्य दिवसातील सततचा पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे ही नवीन पालवी अपेक्षित प्रमाणात आलेली दिसत नाही. आता बऱ्यापैकी उन्हे पडत असून, ही पालवी चांगल्या प्रमाणात बाहेर पडण्याची शक्यता आहे.

या पूर्वी आलेली आणि येणारी पालवी उत्तम प्रकारे जपण्याची गरज आहे. त्याच्या जोरावरच १० ते १५ नोव्हेंबर दरम्यान आंबा बाग मोहरायला सुरुवात होईल. हा मोहोर संपूर्णपणे बाहेर पडण्यासाठी नोव्हेंबरअखेर उजाडलेली असेल. हे साधल्यास आपणास एप्रिलच्या पहिल्या आठवड्यातच फळांचे उत्पादन मिळू शकेल. हे साध्य करण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढील उपाययोजना काळजीपूर्वक करण्याची आवश्यकता आहे.

पालवीची काळजी : नवीन पालवीवर मुख्यतः रस शोषक किडी, पाने खाणारी अळी, गॉल मीजमाशी यांचा प्रादुर्भाव होत असतो. या किडीच्या नियंत्रणासाठी वेळीच उपाययोजना कराव्यात. पालवी पोपटी कलरची म्हणजेच हिरवी व्हायला लागताच ०–५२–३४ (मोनो पोटॅशिअम फॉस्फेट) या विद्राव्य खताची ६ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे दहा ते बारा दिवसाच्या अंतराने दोन फवारण्या घ्याव्यात. त्याच प्रमाणे ०–०–५० (पोटॅशिअम सल्फेट) ६ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणे एखादी फवारणी घेतल्यास पालवी लवकर पक्व होण्यास मदत होते. या फवारण्यानंतरही पालवी पक्वतेपासून दूर असल्यास गरजेनुसार क्लोरमेक्वाट क्लोराईड (अॅग्रेस्को शिफारस) १.५ मिलि प्रति लिटर या प्रमाणे एखादी फवारणी घ्यावी. फारच आवश्यकता असल्यास दहा ते बारा दिवसानंतर दुसरी फवारणी घ्यावी. बाग मोहरण्याच्या तीन आठवडे आधी पोटॅशिअम नायट्रेट (१३–०–४५) या विद्राव्य खताची ४% प्रमाणे (४० ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणे) फवारणी घ्यावी. यामुळे मोहोर हमखास व अतिशय जोमदार, निरोगी बाहेर पडण्यास मदत होते.



वाढलेले तण आणि काढणी : बागेतील वाढलेली तणे शक्यतो मनुष्यबळाने काढून घ्यावीत. अगदीच मजुरांची अडचण असल्यास तणनाशकाचा वापर करावा. बारा ते पंधरा दिवसानंतर वाळलेली ही तणे कल्टिवेटर किंवा मोगड्याच्या साह्याने जमिनीत गाडून टाकावे. त्यामुळे त्याचे उत्तम दर्जाच्या सेंद्रिय खतांमध्ये रूपांतर होते.

बागेतील मशागत मोठ्या नांगराद्वारे (नऊ इंची) करणे टाळावे. कारण सहा इंचापेक्षा जास्त खोल मशागतीमुळे दोन्ही ओळीच्या मधील वाढलेली मोठी मुळे तुटण्याची शक्यता असते..

पाणी व खत व्यवस्थापन : पावसाळा संपल्यानंतर शक्यतो ७५ ते ८० टक्के मोहोर बाहेर पडेपर्यंत बागेस पाणी देऊ नये. मात्र, अति हलक्या खडकाळ जमिनीतील बागेमध्ये गरजेप्रमाणे ठिबकने अधून मधून थोडे पाणी द्यावे. म्हणजे पाण्याअभावी झाडे सुकण्याची समस्या टाळता येईल. बागेस जूनच्या सुरुवातीला शेणखत व रासायनिक खताचा डोस दिलेला असेल. आता मागील लेखातील वेळापत्रकाप्रमाणे ठिबकद्वारे शिफारशीत पद्धतीने सिंचन व खते द्यावीत.

वरील शास्त्रीय उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी केल्यास बागेमध्ये मोहोर येण्यासंदर्भातील अडचणी कमी होतात. या वर्षीचा मोहोर नोव्हेंबरमध्ये पूर्णतः बाहेर पडलेला दिसेल, असा अंदाज आहे. अंदाज म्हणण्याचे कारण म्हणजे आपण वापरत असलेल्या व्यवस्थापनाला वातावरणाची साथही मिळावी लागते. ऑक्टोबरमध्ये हवामान किती प्रमाणात कोरडे राहते, पुढे थंडी कधी सुरू होते व किती प्रमाणात पडते, अशा वातावरणाच्या बाबींवर अनेक गोष्टी अवलंबून असतात. एखाद्या वेळेस सप्टेंबरची पालवी गेल्या वर्षासारखी थोड्याफार प्रमाणात ऑक्टोबरमध्ये येऊ शकते. पण एकंदरीत या वर्षी आतापर्यंतच्या हवामानाच्या आधारे आपली आंबा झाडे वेळेवर आणि चांगल्या प्रकारे मोहरतील यात शंका नाही.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९१५ : पहिले महायुद्ध शॅम्पेनची दुसरी लढाई सुरू
१९१९ : रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली.
१९२९ : डॉ. जेम्स डूलिटिल यांनी संपूर्णपणे उपकरणांच्या साहाय्याने विमानाचे उड्डाण, प्रवास व लँडींग केले.
१९४१ : 'प्रभात'चा 'संत सखू' हा चित्रपट पुणे व मुंबई या दोन्ही ठिकाणी प्रदर्शित झाला.
१९५० : साली सयुक्त राष्ट्राने दक्षिण कोरियाची राजधानी सियोल ला आपल्या नियंत्रणात आणल.
१९६२ : अल्जीरिया प्रजासत्ताक झाले.
१९८१ : सांड्रा डे ओ'कॉनोर अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयातील सर्वप्रथम स्त्री न्यायाधीश झाली.
१९९९ : अवकाश शास्त्रज्ञ डॉ. कस्तुरीरंगन यांना एच. के. फिरोदिया पुरस्कार जाहीर.
१९९९ : रसायन शास्त्रज्ञ प्रा. एम. एस. शर्मा यांना एच. के. फिरोदिया पुरस्कार जाहीर.
१९९९ : डॉ. पाल रत्नासामी यांना एच. के. फिरोदिया पुरस्कार जाहीर.
२००३ : जपानच्या होक्काइदो शहराजवळ समुद्रात रिश्टर मापन पद्धतीनुसार ८.० तीव्रतेचा भूकंप.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६९४ : युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान हेन्री पेल्हाम यांचा जन्म.
१७११ : चिनी सम्राट कियान लाँग यांचा जन्म.
१८९९ : भारतीय कवी आणि गीतकार उदमुलाई नारायण कवी यांचा जन्म.
१९११ : त्रिनिदाद आणि टोबॅगो देशाचे पहिले पंतप्रधान एरिक विल्यम्स यांचा जन्म. (मृत्यू: १९ मार्च १९८१)
१९१६ : पण्डित दीनदयाळ उपाध्याय तत्त्वज्ञ, अर्थतज्ञ, समाजशास्त्री, इतिहासकार, पत्रकार, राजकीय नेते आणि जनसंघाचे एक संस्थापक (मृत्यू: ११ फेब्रुवारी १९६८)
१९२० : सतीश धवन इस्रोचे अध्यक्ष (मृत्यू: ३ जानेवारी २००२)
१९२२ : नौरूचे पहिले पंतप्रधान हॅमर डिरॉबुर्ट यांचा जन्म.
१९२२ : बॅ. नाथ पै स्वातंत्र्य सैनिक व घटनातज्ञ (मृत्यू: १७ जानेवारी १९७१ बेळगाव)
१९२५ : रघुनाथ विनायक हेरवाडकर बखर वाङ्मयकार (मृत्यू:)
१९२६ : बाळकृष्ण हरी तथा 'बाळ' कोल्हटकर नाटककार, कवी, अभिनेते, निर्माते, लेखक व दिग्दर्शक (मृत्यू: ३० जून १९९४)
१९२८ : माधव गडकरी पत्रकार (मृत्यू: १ जून २००६)
१९३२ : स्पेनचे पहिले पंतप्रधान एडॉल्फो साराझ यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च २०१४)
१९३८ : ग्रीनलँडचे पहिले पंतप्रधान जोनाथन मोत्झफेल्ट यांचा जन्म.
१९३९ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते फिरोज खान यांचा जन्म. (मृत्यू: २७ एप्रिल २००९)
१९४० : भारतीय–इंग्लिश संशोधक, इतिहासकार, आणि लेखक टिम सेव्हरिन यांचा जन्म.
१९४६ : बिशन सिंग बेदी फिरकी गोलंदाज
१९५६ : साली अमेरिका आणि युरोप या राष्ट्रांमध्ये पहिली अंडर वाटर टेलिफोन सेवा सुरु झाली होती.
१९६९ : हॅन्सी क्रोनिए दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेट कप्तान (मृत्यू: १ जून २००२)
१९९२ : साली अमेरिकन अंतराळ संस्था नासाने मंगळ ग्रहाचे पृष्ठभाग, वातावरण, हवामान आणि चुंबकीय क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी मार्स ऑब्जर्व्हर स्पेसक्राफ्ट, म्हणजेच मार्स जिओसायन्स / क्लायमेटोलॉजी ऑर्बिटर नावाचा रोबोट स्पेस प्रोब अवकाशात पाठवला.
२०१७ : साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना म्हणजेच 'सौभाग्य' योजनेची सुरुवात केली.
२०१७ : साली पश्चिम बंगाल येथील तृणमूल काँग्रेसचे वरिष्ठ नेता मुकुल रॉय यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१०६६ : नॉर्वेचा राजा हॅराल्ड (तिसरा) यांचे निधन.
१५०६ : कॅस्टिलचा राजा फिलिप (पहिला) यांचे निधन.
१६१७ : जपानी सम्राट गो–योझेई यांचे निधन.
१९१४ : साली भारतीय राजकारणी व भारताचे माजी सहावे उपपंतप्रधान चौधरी देवीलाल यांचा जन्मदिन.
१९५५ : साली जॉर्डन देशातील रॉयल जॉर्डनियन एअर फोर्स या वायुदलाची स्थापना करण्यात आली.
१९८३ : बेल्जियमचा राजा लिओपोल्ड (तिसरा) यांचे निधन.
१९८९ : साली भारतीय स्वातंत्रता सेनानी व साहित्यकार सुदर्शन सिंह चक्र यांचे निधन.
१९९० : पश्चिम बंगालचे तिसरे मुख्यमंत्री प्रफुल्लचंद्र सेन यांचे निधन. (जन्म: १० एप्रिल १८९७)
१९९८ : रंगकर्मी, दिग्दर्शक, निर्माते व लेखक कमलाकर सारंग यांचे निधन. (जन्म: २९ जून १९३४)
२००४ : अरुण बाळकृष्ण कोलटकर मराठी व इंग्रजी कवी (जन्म: १ नोव्हेंबर १९३२)
२०१० : साली पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भरतीय वरिष्ठ हिंदी पत्रकार, साहित्यकार, कवी व गीतकार तसचं, नवभारत टाइम्सचे भूतपूर्व वैशिष्ट्य संपादक कन्हैया लाल नंदन यांचे निधन
२०१३ : शं. ना. नवरे लेखक (जन्म: २१ नोव्हेंबर १९२७)



राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत

गुरूवार दि.२६ सप्टेंबर २०२५ ५



# नैसर्गिक संकटात घाबरून जाऊ नका ; धैर्याने सामना करा-सभापती प्रा. राम शिंदे

## प्रशासन नागरिकांच्या मदतीसाठी तत्पर

जामखेड । प्रतिनिधी

जामखेड तालुक्यात अतिवृष्टी व पुरामुळे शेतपीक, घरे, विहिरी, पशुधन यांचे मोठे नुकसान झाले असून ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. या नुकसानीची विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज (ता. २३ सप्टेंबर) प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला.प्रा. शिंदे म्हणाले , ''नैसर्गिक संकटाच्या काळात नागरिकांनी घाबरून न जाता धैर्याने सामना करावा. एकमेकांना सहकार्य करणे हीच खरी ताकद आहे. प्रशासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. कुठलीही जीवित वा पशुहानी होऊ नये यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी.

सभापतींनी दरडवाडी येथे पुराने नुकसान झालेल्या पुलाची पाहणी करून ग्रामस्थांशी चर्चा केली. मोहरी येथील तुटलेल्या तलावाचे निरीक्षण करून शेतकऱ्यांशी संवाद साधला.



दिघोळ व जातेगाव येथे मांजरा नदीच्या पुराने वाहून गेलेल्या शेतजमिनी, नुकसानग्रस्त घरे व घरातील वस्तूंची पाहणी करून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.ग्रामस्थांशी संवाद साधताना प्रा. शिंदे यांनी स्पष्ट सूचना दिल्या की, सर्व शेतपीक, जमीन, घरे, विहिरी, पशुधन आणि अन्य नुकसानीचे तातडीने व सरसकट पंचनामे करून मदत तत्काळ पोहोचवावी. कोणताही नागरिक मदतीपासून वंचित राहणार नाही, याची ग्वाही त्यांनी दिली.

या पाहणीदरम्यान जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, कुकडी सिंचन मंडळाच्या अधीक्षक अभियंता अल्का अहिरराव, कार्यकारी अभियंता प्रवीण घोरपडे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपविभागीय अधिकारी नितीन पाटील, तहसीलदार मच्छिंद्र ठाणके यांच्यासह महसूल, कृषी, वन व जलसंधारण विभागातील अधिकारी, स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# पूरग्रस्तांना एकनाथ शिंदेंकडून साहित्याचे कीट



धाराशिव । प्रतिनिधी

मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात पावसाने कहर केला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेती आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे. याच पार्श्वभूमीवर, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शेतक-यांच्या बांधावर दाखल झाले आहेत. शिंदे हे सध्या धाराशिव जिल्ह्याचा दौरा करत आहेत. यावेळी त्यांनी पूरग्रस्त भागातील नागरिकांना मदतीचा हात देत लोकोपयोगी कीट दिले आहे.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून पूरग्रस्तांना मदत केली जात आहे. या मदतीसाठी खास १२ साहित्यांचे कीट तयार करण्यात आले आहे. हे कीट घेऊन १८ टेम्पो धाराशिवमध्ये दाखल झाले आहेत. या मदतीच्या कीटवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा फोटो लावण्यात आला आहे. पूरग्रस्तांसाठी तयार करण्यात आलेल्या या कीटमध्ये साधारण १२ दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचा समावेश आहे. ही सर्व सामग्री पूरग्रस्त कुटुंबांना तात्काळ मदत मिळावी यासाठी देण्यात येत आहे. ५ किलो पीठ, पोहे, मूगडाळ, शेंगदाणे, २ ब्लँकेट, साखर, चहा पावडर, मसाला, तांदूळ, हळद, तेल, मीठ आदी साहित्याचे किट देण्यात आले

# सतीश घाटगे यांच्याकडून पूरग्रस्त कुटुंबाला किराणा साहित्याचे वाटप

अंबड । प्रतिनिधी

गल्हाटी नदीला आलेल्या पुरामुळे अंबड तालुक्यातील पिठोरी सिरसगाव गावातील अनेक कुटुंबांच्या घरात पाणी शिरल्याने नुकसान झालं. या संकटात समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा भाजप नेते सतीश घाटगे यांनी पूरग्रस्त कुटुंबांना भेट देऊन नुकसानीची पाहणी केली.

तसेच तात्पुरती मदत म्हणून किराणा साहित्याचे वाटप केले. अतिवृष्टी आणि सततच्या पावसामुळे रविवारी रात्री गल्हाटी नदीला मोठा पूर आला. या पुराचे पाणी पिठोरी सिरसगावमधील अनेक घरांमध्ये शिरल्याने घरातील संसारोपयोगी वस्तू आणि अन्नधान्य पूर्णपणे खराब झालं. यामुळे अनेक कुटुंबांचा संसार उघड्यावर आला आहे. त्यांच्यासमोर अन्न आणि निवाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

या परिस्थितीत पूरग्रस्त कुटुंबांना सतीश घाटगे यांनी आधार दिला. सोमवारी त्यांनी गावाला भेट देऊन घरोघरी जाऊन पूरग्रस्तांची भेट घेतली. तहसीलदार विजय चव्हाण यांच्याशी संपर्क करून तातडीने नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना केल्या. तसेच पूरग्रस्त कुटुंबांना तात्पुरती मदत म्हणून किराणा साहित्य पाठवले.मंगळवारी गावातील माजी सरपंच रामेश्वर माने, भाजपा कार्यकर्ते प्रेमानंद उढाण यांच्यासह गावकऱ्यांनी घरोघरी जाऊन पूरग्रस्त कुटुंबांना किराणा साहित्य पोहोचवले. सतीश घाटगे यांच्या या तत्पर भूमिकेमुळे पूरग्रस्त कुटुंबांना मोठा आधार मिळाला आहे.



# एक लाख ६९ हजार घरगुती वीज ग्राहकांना मिळाली २६ लाखाची सवलत

लातूर । प्रतिनिधी

स्मार्ट मीटर (टीओडी मीटर) बसवलेल्या लातूर परिमंडळातील १ लक्ष ६९ हजार ४६१ वीजग्राहकांना जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यात सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत वापरलेल्या वीज युनिटसाठी वीजबिलात २६ लक्ष ९३२ रुपयांची सवलत मिळाली आहे. यात लातूर मंडळातील ९३ हजार ७६४ ग्राहकांना जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यात दिवसा वापरलेल्या वीज युनिटसाठी वीजबिलात १३ लक्ष ७८ हजार ४७९ रुपयांची टीओडी सवलत मिळाली आहे. तर धाराशिव मंडळातील ३९ हजार ६४ वीजग्राहकांना ५ लक्ष ३७ हजार ८८२ तसेच बीड मंडळातील ३६ हजार ६३३ वीजग्राहकांना ६ लक्ष ८४ हजार ५७१ रुपयांची टीओडी सवलत मिळाली आहे.

महावितरणकडून राज्यात ग्राहकांना मोफत स्मार्ट टीओडी मीटर बसविण्यात येत आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने



औद्योगिकग्राहका नंतर घरगुती ग्राहकांना प्रथमच १ जुलै २०२५ पासून दिवसाच्या वीज वापरामध्ये (टीओडी) प्रतियुनिट ८० पैसे ते १ रुपया सवलत जाहीर केली आहे. महावितरणच्या टीओडी मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत वापरलेल्या विजेच्या युनिटसाठी १ जुलै २०२५ पासून प्रती युनिट ८० पैसे टीओडी (टाईम ऑफ डे) सवलत लागू झाली आहे. पुढील पाच वर्षांसाठी निश्चित केलेल्या वीजदरामध्ये मार्च २०२६ पर्यंत ८० पैसे, सन २०२६-२७ करिता ८५ पैसे, सन २०२७ ते २०२९ करिता ९० पैसे तर सन २०२९-३० मध्ये १ रुपये प्रतियुनिट सवलत जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार घरगुती ग्राहकांना टीओडीप्रमाणे वीजदरात सवलत मिळण्याचा प्रत्यक्ष फायदा १ जुलैपासून सुरू झाला आहे.

# परळी शहरात डेंग्यू व संसर्गजन्य रोगांचा वाढता प्रादुर्भाव

परळी । प्रतिनिधी

परळी शहरात डेंग्यू, मलेरिया, ताप, सर्दी-खोकला व आंत्रज्वर यांसारख्या संसर्गजन्य आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत असून नागरिक आरोग्याच्या गंभीर समस्यांना सामोरे जात आहेत. पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचणे, नाल्यांची सफाई न होणे, चिखल व घाणीचे डबके तयार होणे यामुळे डासांचे प्रजनन मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्याचबरोबर शहरातील रस्त्यांवर अनेक खोल खड्डे पडल्याने वाहतुकीची मोठी समस्या निर्माण झाली असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अडचणी वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर ॲड. मनोज संकायें मित्र मंडळ, परळी यांच्या वतीने नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात शहरात तातडीने डास नियंत्रणासाठी शास्त्रोक्त फवारणी करावी, पावसामुळे साचलेले पाणी व चिखल हटवून योग्य साफसफाई करावी, तसेच खड्डेमय रस्त्यांची त्वरित दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, परळी शहरात रस्त्यांची अवस्था खड्डेमय झाली असून त्यात पाणी साचल्यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. यामुळे नागरिक आणि विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. दुसरीकडे, डासांचा प्रादुर्भाव वाढून रुग्णसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे शहरातील रुग्णालयांवर प्रचंड ताण पडत आहे. नागरिकांचे आरोग्य व सुरक्षितता सुरळीत राखण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे हे नगरपरिषद प्रशासनाचे कर्तव्य आहे. मात्र दुर्लक्ष केल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते, असा इशारा मित्र मंडळाने दिला आहे. निवेदनावर ॲड. मनोज संकायें यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांच्या सह्या असून सर्वांनी मिळून परळीकरांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी नगरपरिषदेकडे ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. यावेळी शिरीष सलगरे ,कैलास रिकीबे, संतोष कांबळे, गणेश गीते, देवदास मुंडे ,परमेश्वर मुंडे, बाळू मुंडे ,मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते

# विष्णुपुरीचे १६ दरवाजे उघडले; गोदावरी नदीने धोक्याची पातळी ओलांडली



नांदेड । प्रतिनिधी

जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे छ. संभाजीनगर येथील जायकवाडी, बीड जिल्ह्यातील माजलगाव, सिद्धेश्वर, खडकपूर्णा, निम्नदुधना तसेच अहिल्यानगर येथील विविध धरणांमधून गोदावरी नदी पात्रात मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू आहे. अशा स्थितीत गोदावरी नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. ही परिस्थिती लक्षात घेता नांदेड जिल्ह्यावर पुराचे गंभीर संकट निर्माण झाले आहे.

विष्णुपुरी प्रकल्पात येणा-या वाढीव पाण्याचा विचार करून त्या प्रमाणात विष्णुपुरी प्रकल्पातूनही पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे गोदावरी नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. शहरातील अनेक सखल भागात नदीचे पाणी शिरले असून नागरिकांचे स्थलांतर सुरू आहे. प्रशासनाकडून आवश्यक ती खबरदारी घेतली जात असल्याचा दावा करण्यात येत आहे. विष्णुपुरी प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रातील जायकवाडी, माजलगाव, सिद्धेश्वर, निम्नदुधना आणि खडकपूर्णा प्रकल्प पूर्ण क्षमतेनं भरले आहेत. सर्व धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे. नांदेड जिल्ह्याला येलो अलर्ट देण्यात आला आहे. विष्णुपुरी प्रकल्पामध्ये सध्या दररोज दोन लाख क्यूसेक पाण्याचा येवा वाढला आहे. हा येवा पुढील ६ ते ७ तासांत तीन लाख क्यूसेक्सपर्यंत जाण्याचा अंदाज आहे.

# माजी आ. गोरंट्याल विरोधात आक्षेपार्ह कमेंट केल्याने रहीम तांबोळी पकडला

जालना । प्रतिनिधी

माजी आमदार श्री कैलास गोरंट्याल यांचे बाबत सोशल मिडीयावर इंस्टाग्राम_१९२० यावरुन आक्षेपार्ह कमेंट करणा-या अनोळखी ईसमा बाबत पोलीस ठाणे सायबर जालना येथे दि.१८.०८.२०२५ रोजी अपराध क्रमांक २०/२०२५ कलम ७५ (१) (), ३५६(२), ३(५) सह ६६() अन्वये गुन्हा दाखल झाला होता,

पोलीस ठाणे सायबर जालना येथून इंस्टाग्राम_१९२० हि कोणाची आहे याबाबत तांत्रिक विश्लेषनाव्दारे तपास करुन सदरची आय डी हि रहिम लतिफ तांबोली रा. मंठा जि. जालना याने तयार केलेली असुन त्यानेच सदरची आक्षेपार्ह कमेंट केल्याचे तपासत निष्पन्न झाले होते.

सदर आरोपी हा गुन्हा घडल्यापासून फरार झाला होता त्याचा पोलीस ठाणे सायबर तसेच स्थानिक गुन्हे शाखा जालना येथून शोध घेणे सुरु होते. स्थानिक गुन्हे शाखाचे पथक यांना सदर आरोपी बाबत गोपनीय यातमीदारा मार्फत मिळालेल्या खबरीवरुन त्यांनी दि. २२.०९.२०२५ रोजीला आरोपीस मंठा पेचुन अटक करण्यात आले असुन त्याचा आज रोजीला मा. विदयमान कोर्टा कडुन पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेला आहे. सदर आरोपी कडुन त्याचे गुन्हा करण्यासाठी वापरलेला मोबाईल जप्त करण्यात आलेला असून गुन्हयाचा तपास सुरु आहे.सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधिक्षक श्री आयुष नोपाणी, पोलीस उपअधिक्षक जालना श्री अनंत कुलकणी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री गुणाजी शिंदे पो. स्टे सायबर जालना, पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव, स्थागुशा जालना यांचेसह पोउपनि श्री योगेश चव्हाण, पोउपनि राजेंद्र वाघ, पोउपनि सुनिल पोटोळे, पोह संदिप मटि, सचिन चौधरी, इशांद पटेल, गोपाल गौशिक, मनोज हिवाळे, सुरज चरावंडे यांनी केली आहे.

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५२२**
**दिनांक -२२/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती अमृता सुरेंद्र बुर्ले रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतःच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अमृता सुरेंद्र बुर्ले | स्वतः | ०१/०४/१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२२/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५२३**
**दिनांक -२२/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती शांताबाई अजिनाथजी बुर्ले रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या आजी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शांताबाई अजिनाथजी बुर्ले | आजी | १०/०६/२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२२/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५३६**
**दिनांक -२२/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती अजिनाथ आण्णाजी बुर्ले रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या आजोबा जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अजिनाथ आण्णाजी बुर्ले | आजोबा | २१/०५/२०१५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२२/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

# मंत्री दत्तामामांनी सगळ्यांसमोरच अधिकाऱ्याला झापलं

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

: मराठवाड्यात मुसळधार पावसाने थैमान घातलं असून शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झालं आहे. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत काल शेतकऱ्यांसाठी मदतीची घोषणा करण्यात आल्यानंतर आज अनेक मंत्री नुकसानीची पाहणी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले आहेत. राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे हे आज जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भेटण्यासाठी गेले होते. यावेळी संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या कामकाजावर संताप व्यक्त करत कृषीमंत्र्यांवर प्रश्नांची सरबत्ती केली. त्यानंतर कृषीमंत्री भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्याला फोन करून चांगलंच झापलं.

''ज्यांची शेतजमीन खरडून गेली आहे त्याचे तुम्ही पंचनामे का करत नाही? सगळ्या नुकसानीची ताबडतोब पंचनामे करा. जिथं जमीन खरडली आहे, पशूधनाचे नुकसान झाले आहे ते सगळे पंचनामे करा. एकाही गुंठ्याचा पंचनामा राहिला तर तुम्ही जबाबदार असाल,'' अशा शब्दांत दत्तात्रय भरणे यांनी महसूल अधिकाऱ्याला झापलं आहे. दरम्यान, आम्हाला २-३ हजारांची तुटपुंजी मदत देऊ नका, हेक्टरी ५० हजारांची मदत करा, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली. त्यावर आम्ही शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. नुकसान झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याला सरकारकडून मदत मिळेल, असं आश्वासन यावेळी दत्तात्रय भरणे यांनी दिलं.

# शेतकऱ्यांच्या आयुष्याची राखरांगोळी झालीय, तातडीने मदत करा - बाळराजे पवार

## ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतली पवारांकडून माहिती

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई मतदारसंघात पडलेल्या मुसळधार पावसाने शेत पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेती खरडून गेली आहे. बांधलेल्या विहीरी खचल्या आहेत.

त्याच बरोबर, नागरिकांच्या घरात पाणी गेल्याने अनेकांचे संसार उघडय़ावर आलेत. त्यामुळे, हे नुकसान भरून निघणारे नाही. शासनाने तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी बाळराजे पवार यांनी केली आहे. दरम्यान, युवा नेते बाळराजे पवार यांनी मंगळवार ता. २३ रोजी सिंदफणा काठच्या गावांना भेटू देऊन नुकसान झालेल्या भागाची पाहाणी केली. राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्याशी व्हिडीओ कॉलवरून संवाद साधून, गेवराई मतदारसंघातल्या नुकसानीचे सविस्तर माहिती दिली. झालेल्या नुकसानी संदर्भात चर्चा करून, नुकसानग्रस्त भागाचा सविस्तर अहवाल द्या, अशी सूचना



ना. मुंडे यांनी पवार यांना केली आहे. सदरील संभाषण युवा नेते बाळासाहेब सानप यांच्या मोबाईलवर झाले.गेवराई तालुक्यातील विविध भागाला, रविवार व सोमवारी पून्हा मुसळधार पावसाने अक्षरश झोडपून काढले आहे. शहराच्या पश्चिम, उत्तर, दक्षिण भागातील गाव रहदारीचे रस्ते पाण्यात गेले आहेत. त्यामुळे, जन जीवन विस्कळीत झाले आहे. शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. सर्वाधिक फटका गोदावरी व सिंदफणा काठावर असलेल्या गावांना बसला असून, उभ्या पिंकाचे नुकसान झाले आहे. शेती पिकांसह खरडून गेली आहे. बांधलेल्या विहीरी ढासळून बुजून गेल्या आहेत. कापूस पिकाला फटका बसला



आहे.मंगळवार ता. २३ रोजी बाळराजे पवार यांनी सिंदफणा गाठच्या गावांना भेटी देऊन, नुकसानग्रस्त भागाची पाहाणी करून; नागरीकांशी संवाद साधला. सिरसमार्ग, धारवंटा, उक्कडपिंप्री, साक्षाळपिंप्री गावातील शेतीचे प्रचंड नुकसान झालेले असल्याने, या भागातील शेतकर्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. सिंदफणा काठावरच्या गावांचे झालेले नुकसान पाहता असताना, युवा नेते बाळासाहेब सानप यांनी थेट पंकजाताई मुंडे यांच्याशी व्हिडीओ कॉलवर संपर्क केला. यावेळी , बाळराजे पवार यांनी ना. मुंडे यांच्याशी सविस्तर चर्चा करून, उद्भवलेल्या परिस्थितीची सविस्तर माहिती दिली. सिंदफणा आणि गोदाकाठच्या गावांच्या बाधित झालेल्या क्षेत्राचा सविस्तर अहवाल द्या, अशी सूचना ना. मुंडे यांनी बाळराजे पवार यांना केली आहे. दरम्यान, गेवराई मतदारसंघात पडलेल्या मुसळधार पावसाने शेत पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेती खरडून गेली आहे. बांधलेल्या विहीरी खचल्या आहेत.

त्याच बरोबर, नागरिकांच्या घरात पाणी जाऊन, संसार उघडय़ावर आलेत. त्यामुळे, हे नुकसान भरून निघणारे नाही. शासनाने तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी आग्रहाची बाळराजे पवार यांनी केली आहे

यावेळी अनिल पौळ, बाळासाहेब सानप,पवन गावडे,रमेश तळेकर, सचिन वावरे,विष्णुपंत आतकरे, श्रीराम घाटुळ, पत्रकार जुनेद बागवान, सुभाष सुतार, आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते

## पिके सडली, नदीकाठी मातीच राहिली नाही; पंचनामे करता कशाचे?



**खा.बजरंग सोनवणे यांचा सवाल, राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षांसोबत बांधावर जावून केली नुकसानीची पाहणी**

बीड । प्रतिनिधी

दहा दिवसांपासून जिल्ह्यात अतिवृष्टी होत आहे.यामुळे नद्यानाल्यांना महापूर गेला. परिणामी, पाण्यामुळे पिके सडली आहेत. अनेक ठिकाणी मातीही खरडून गेली आहे. अशावेळी पंचनामे कशाचे करता, असा सवाल खा.बजरंग सोनवणे यांनी उपस्थित केला. शिवाय ओला दुष्काळ जाहिर करून सरसकट मदत द्या, अशी मागणीही त्यांनी केली.

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे हे बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या भेटीसाठी आणि नुकसानपाहणीसाठी दौऱ्यावर आले होते. यावेळी खा.बजरंग सोनवणे, आ.संदिप क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, माजी आ.सलीम भाई, मेहबूब शेख ,उषाताई दराडे, सुशीलाताई मोराळे आदी प्रमुख पदाधिकारी सकाळपासून या दौऱ्यात सहभागी होते. बीड तालुक्यातील ◀◀ पान २ वर

## शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या –डॉ.ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

**अतिवृष्टीमुळं शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांचे पावसामुळे झालेले नुकसान लक्षात घेता सरकारने ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी अशी मागणी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कृषी मंत्री यांच्या कडे केली आहे.**

राज्यात सध्या मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. मराठवाड्यासह जळगाव, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव, बीड या जिल्ह्यांत अतिवृष्टीने अक्षरशः हाहाकार माजवला आहे. बीड जिल्ह्यात पावसामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पावसाने कहर केला तर पुढील संपूर्ण आठवडा पावसाचा असणार आहे. तसेच, शुक्रवारनंतर पावसाचा जोर आणखी वाढणार असल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे. या मुसळधार पावसाने मोठ्या प्रमाणावर शेतीपिकांचं नुकसान झालं आहे. दरम्यान, आधी अवकाळी आणि आता अतिवृष्टीमुळं शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांचे पावसामुळे झालेले नुकसान लक्षात घेता सरकारने शेतकऱ्यानं मदत करावी.

## तागडखेल ग्रामस्थ जलसमाधी घेण्यासाठी उतरले नदीत

म्हसोबावाडी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील तागडखेल गावचे युवा कार्यकर्ते सचिन गव्हाणे सह तागडखेल गावाच्या नदी गाठील सर्व ग्रामस्थ दि.२२ सप्टेंबर रोजी नदीत बसुन प्रशासन विरोधात जलसमाधी घेण्यासाठी उतरले या वेळी सर्व लहान थोर मुले होते यावेळी फक्त अन्? फक्त एकच आक्रोश होता आमच्या पिकांचे, अन्? राहत्या घराचे अन्? झालेले शेतीचे नुकसान याची भरपाई लवकारात लवकर व्हावी अन्? आमच्या कुटुंबाला हातभार लावुन मरण्यापासुन प्रशासानाने वाचवावे हे जलसमाधी उपोषण सोडवण्यासाठी आष्टी तालुक्याचे नायब तहसीलदार साहेब,तलाठी साहेब, ग्रामसेवक साहेब आले असता त्यांनी लवकरच



या नुकसानीचे भरपाई देऊ असे सांगताच हे उपोषण मागे घेण्यात आले या उपोषण वेळी आरणविरहा तागडखेल ग्रुप ग्रामपंचायतचे सर्व ग्रामस्थ व आमच्या दैनिकचे प्रतिनिधी –प्रेम पवळ उपस्थित होते.

कापसाचे बोंड कुजून चालले आहे, सोयाबीन दाण्याला कोम फुटायला लागलेत.. किती दिवस ओला दुष्काळ जाहीर करणार नाही सरकार?? तागडखेल गव्हाणे वस्ती येथील शेतकऱ्यांनी महापुरामुळे शेतीच्या होणाऱ्या नुकसानीमुळे होणाऱ्या त्रासाला कंटाळून जलआंदोलन केले...शासन दरबारी मदतीची आर्त हक्क दिली.

## ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रूपये आर्थिक मदत करा - राजेसाहेब देशमुख

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह अंबाजोगाई आणि परळी वैजनाथ तालुक्यात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यात पुन्हा-पुन्हा मुसळधार पाऊस पडत आहे. एकीकडे पावसाचे पाणी तर दुसरीकडे धरणातून सोडण्यात येणारा पाण्याचा विसर्ग त्यामुळे डोंगर पट्टा व नदीकाठच्या पिकांचे, शेतीचे, घरांचे, पशुधनाचे, पाळीव प्राणी, अनेकांच्या जिवিতাचे, शेतीपूरक साहित्य, राहती घरे, विहिरी, सोलार पॅनल, सोलार पंप, रस्ते, पुल, पाझर तलाव, साठवण



तलाव यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. काही गावांचा संपर्क ही तुटला आहे. अनेक गावांत घरांत पाणी शिरल्यामुळे नागरिकांना रात्र जागून काढावी लागत आहे. अपरिमित हानी झाल्यामुळे नागरिक, शेतकरी हवालदिल झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी मागील काही दिवसांपासून अंबाजोगाई आणि परळी वैजनाथ तालुक्यात गावोगावी जाऊन नागरिक, शेतकऱ्यांना दिलासा दिला. तहसीलदार, महसूल, कृषी अधिकाऱ्यांना फोनवरून संपर्क साधून सरसकट पंचनामे करण्याची विनंती करून शेत जमीन खरवडली, पिके वाहून गेली, त्यामुळे ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ प्रति हेक्टरी ५० हजार रूपये नुकसान भरपाई द्यावी, आर्थिक मदत करावी अशी मागणी केली आहे.

बुधवारी सकाळीच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी अंबाजोगाई तालुक्यातील माकेगाव, धानोरा खुर्द, तटबोरगाव, अंजनपूर, कोपरा, देवळा, आपेगाव आदी गावांतील पूरपरस्थिती ◀◀ पान २ वर

## दांडिया उत्सव म्हणजे महिलांच्या कलागुणांना वाव देणारे व्यासपीठ –अजय मुंडे

परळी । प्रतिनिधी

''दांडिया उत्सव हा महिलांच्या कलागुणांना वाव देणारा उत्सव आहे'' असे जिल्हा परिषदेचे गटनेते अजय मुंडे यांनी प्रतिपादन केले. महिलांनी आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे मत डॉ संतोष मुंडे यांनी व्यक्त केले. तर ''आजच्या काळात महिलांसाठी विविध उपक्रम राबविण्याची दांडिया महोत्सवातून गरज अधोरेखित होते'' असे बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले. ते तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.



येथील तेली समाजाच्या वतीने सार्वजनिक दांडिया महोत्सवाचे आयोजन श्री शनी मंदिरात करण्यात आले असून या दांडिया महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते श्री शनी देव व तुळजाभवानी देवीची आरती करण्यात आली. यानंतर युवानेते अजय मुंडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून दांडिया महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांचा तेली समाज सार्वजनिक दांडिया उत्सव समितीच्या वतीने पुष्पहार,शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अजय मुंडे यांनी सर्व महिला भगिनींना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा देत पवन फुटके यांनी समाजासाठी काहीतरी करावे या हेतूने हा दांडिया महोत्सव सुरू केला तो स्तुत्य उपक्रम आहे. तर डॉ संतोष मुंडे यांनी महिलांच्या आरोग्याबद्दल बोलत असताना सांगितले की, येथे महिलांसाठी मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सर्व महिलांनी तपासणी करुन घ्यावी.कार्यक्रमास जिल्हा परिषद ◀◀ पान २ वर

## माजलगावात अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे तहसिलवर धरणे




**माजलगाव । प्रतिनिधी**

क्षत्रिय बंधने उठून कैकाडी समाज एससी प्रवर्गात समाविष्ट करावा.या मागणीसाठी अखिल भारतीय काकडे महासंघाच्या वतीने दि २३ सप्टेंबर मंगळवार रोजी तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यास सुरुवात केली आहे.

महाराष्ट्र राज्यात विदर्भामध्ये कैकाडी समाज हा अनुसूचीत जाती प्रवर्गामध्ये येतो परंतू उर्वरीत महाराष्ट्रामध्ये कैकाडी समाज भटक्या विमुक्त जमाती (व्हि.जे.एन.टी.) मध्ये येतो हे उर्वरीत महाराष्ट्रातील कैकाडी समाजावर संपर्णतः अन्यायकारक नियम आहे.महाराष्ट्रातील कैकाडी समाजाचा विदर्भातील कैकाडी समाज बांधवासोबत रोटीबेटीचा व्यव्हार हा गेल्या अनेक वर्षांपासून होत आलेला आहे.तरी शासनाने क्षेत्रिय बंधने ऊठवून संपूर्ण कैकाडी समाज हा अनुसूचित जाती मध्ये समाविष्ट करावा या मागणीसाठी ज्ञानेश्वर मेंडके, लक्ष्मण गायकवाड यांच्या ◀◀ पान २ वर

## नारी शक्तीचा सन्मान करणारा देश महासत्ता होतो - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्त्री रूग्णालय आणि वृद्धत्व व मानसिक आजार रूग्णालय लोखंडी सावरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित स्वस्थ नारी सशक्त परिवार हा नारी शक्तीला शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात आरोग्य उपक्रम सुरू करण्यात आला आहे. अंबाजोगाईत या आरोग्य उपक्रमाचे उदघाटन आज लोखंडी सावरगाव येथे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे समिती सदस्य डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विचारमंचावर वैद्यकीय



अधीक्षक डॉ.चंद्रकांत चव्हाण आणि डॉ.सुनील जाधव यांच्या सह वैद्यकीय अधिकारी डॉ.महादेव केंद्रे, डॉ.डी.पी.गायकवाड, डॉ.कौस्तुभ कोदरकर, डॉ.शिवराज पेस्टे, डॉ.ताथोडे, डॉ.गालफाडे, डॉ.वैभव यांच्यासह येथील नर्सिंग कॉलेजचे साईनाथ सोनवणे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले तसेच आरोग्य देवता धन्वंतरी यांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष तसेच महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे समिती सदस्य डॉ.राजेश इंगोले यांनी माहिती देत असताना सांगितले की, महाराष्ट्र शासनाने स्त्रियांप्रति आरोग्य विषयक जनजागरण आणि प्रबोधन होणे गरजेचे आहे. तसेच स्त्रियांचे आरोग्य निरोगी ठेवणे गरजेचे आहे. हे ओळखून या कार्यक्रमाची निर्मिती केली गेली आहे १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन ते २ ऑक्टोबर गांधी जयंती दिनापर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात हा उपक्रम राबविला जाणार आहे या अंतर्गत स्त्रियांच्या विविध आरोग्य तपासण्या रक्त तपासण्या आहार विषयक मार्गदर्शन तसेच विविध आजारांपासून मुक्त होण्यासाठी उपाययोजनांचे आयोजन केले आहे. या तपासण्यांचा या आरोग्य उपक्रमाचा उपयोग समस्त नारी शक्तीला होणार आहे आणि ज्या देशांमध्ये नारी शक्तीचा सन्मान केला जातो, तो निश्चितच देश महासत्ता होत असतो. ज्या देशांमध्ये स्त्रियांची काळजी घेतली जाते तिथला प्रत्येक परिवार हा स्वस्थ आणि निरोगी असतो. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उध्दारी या उक्तीप्रमाणे स्त्रियांना जर निरोगी ठेवले त्याचा परिणाम म्हणून ते संपूर्ण कुटुंब निरोगी सशक्त राहते कारण घरामध्ये प्रत्येक कुटुंबीयांची काळजी घेणारा सदस्य हा स्त्रीच असतो. स्त्री ही सर्जक आहे जगाची निर्माती आहे. परंतु, येथील परंपरेने स्त्रीला देवाचा दर्जा तर दिला. परंतु, त्याचबरोबर तिला गुलामगिरी मध्ये ही कोंडून ठेवले, तिच्या ◀◀ पान २ वर

## तब्बल ४० गुन्हे असलेला कुख्यात सराईत गुन्हेगार जेरबंद

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडयातील पुणे,सोलापूर, अहिल्यानगर, बीड, सांगलीसह अनेक जिल्ह्यात घरफोड्याच्या गुन्ह्यात पोलिसांना हवा असलेला अट्टल गुन्हेगार चार वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देत जागा बदलून राहत होता.आष्टी पोलिसांनी मंगळवारी रात्री आष्टी पो.स्टे.चे पोह /प्रविण क्षिरसागर व सय्यद मजरुद्दीन यांना गुप्त बातमी मिळाली की,निमगाव चोभा येथील सतिष गिर्हे यांचे घरामध्ये झालेली जबरी चोरी ही सोन्या उर्फ लाल्या ईश्वर भोसले याने केली असुन तो आंधळेवाडी येथे आला आहे.सदर माहितीची खातजमा करुन क्षणात सदरची माहिती पोलीस निरीक्षक श्री.शरद भुतेकर यांना कळविली व त्यांनी उपविभागीय पोलीस



अधिकारी आष्टी यांना माहिती देवून तात्काळ आरोपीला पकडण्यासाठी सपोनि विजय नवरडे व आष्टी येथील पोलीस स्टाफसह आंधळेवाडी येथे जाऊन आरोपीचा निश्चित ठावठिकाणा लावण्यासाठी भर पावसात डोंगरवर तब्बल दोन किलोमिटर पाई चालत जाऊन जिवाची परवा न करता धैर्याने व तत्परतेने सापळा लावुन सोन्या उर्फ लाल्या ईश्वर भोसले रा.बेलगाव ता.कर्जत,जि.अहिल्यानगर यास शिताफीने पकडला आहे पोलिसांच्या कामगिरीचे पोलिस अधीक्षकांकडून कौतुक होत आहे.अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील बेलगाव येथील सोन्या उर्फ लाल्या ईश्वर भोसले याच्यावर बीड,पुणे, सोलापूर,अहिल्यानगर, सांगली,आष्टी यासह अनेक ठिकाणी घोरफोड्या केल्याचे गुन्हे दाखल आहेत.चार वर्षांपासून तो पोलिसांना गुंगारा देत वास्तव बदलून राहत होता.आष्टी पोलिस देखील त्याच्या मागावर होतो.मंगळवारी रात्री तो आष्टी ठाणे हद्दीतील आंधळेवाडी येथील पारधी वस्तीवर आल्याची गोपनीय माहिती मिळताच पोलिसांनी ◀◀ पान २ वर

## महाएल्गार मेळाव्यास केज तालुक्यातून हजारो ओबीसी बांधव उपस्थित राहणार– अशोक राऊत

**केज । प्रतिनिधी**

ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ना. छगनराव भुजबळ यांच्या उपस्थितीत दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी संपन्न होणाऱ्या ओबीसी महाएल्गार मेळाव्यास केज तालुक्यातून हजारो ओबीसी बांधव उपस्थित राहणार असल्याची ग्वाही कानडी माळी येथील सरपंच अशोक राऊत यांनी दिली आहे.

महाएल्गार मेळाव्याच्या पूर्व नियोजनासाठी आज बुधवार दि. २४ सप्टेंबर रोजी कानडी माळी,



चिंचोली माळी, ता. केज येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी समता परिषदेचे कार्याध्यक्ष बापूसाहेब भुजबळ तर यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना अशोक राऊत म्हणाले की, रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४ :०० वाजता बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत हा महाएल्गार मेळावा होणार असून याप्रसंगी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# झारगडवाडी ग्रामपंचायतच्या दोन तत्कालीन सरपंचांवर अपात्रतेची कारवाई

**बारामती । प्रतिनिधी**

तालुक्यातील झारगडवाडी ग्रामपंचायतमध्ये विविध विकास कामांमध्ये गंभीर स्वरूपाची दप्तरी अनियमितता आढळून आल्याने तीन तत्कालीन सरपंचांपैकी दोन तत्कालीन सरपंच नितीन ज्योतीराम शेडगे, व तत्कालीन सरपंच वैशाली संतोष मासाळ यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यात आली आहे. यात त्यांना ग्रामपंचायत सदस्य पदावरून देखील काढून टाकण्याचा आदेश पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुंडकुलवार यांनी दिले आहेत.

झारगडवाडी ग्रामपंचायत मध्ये सन २०२०-२१ ते सन २०२३ - २४ मध्ये झालेल्या विविध विकास कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व अनियमितता झाल्याचे सात मुद्द्याच्या आधारे सामाजिक कार्यकर्ते युवराज पोटे यांनी पुणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे तक्रार केली होती. त्याची दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समिती स्थापन करून त्या मुद्द्याच्या अनुषंगाने सखोल दप्तर तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार सखोल दप्तर तपासणीनंतर सदर समितीने अहवाल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर केला होता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रशासकीय व दप्तरी अनियमितता असल्याचे उघड झाले होते.




पुणे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पुणे विभागीय आयुक्त यांच्या निर्देशानुसार दालनामध्ये सुनावणी घेऊन दोन्ही बाजूच्या दस्तऐवजाच्या आधारे ग्रामपंचायत झारगडवाडी मध्ये गंभीर स्वरूपाच्या प्रशासकीय व दप्तर अनियमितता असल्याचे शिक्कामोर्तब करून अहवाल पुढील कार्यवाहीसाठी पुणे विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर केलेला होता. यामुळे पुणे विभागीय आयुक्त याबाबत काय कार्यवाही करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

अखेर पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुंडकुलवार यांनी अर्जदार युवराज पांडुरंग पोटे यांच्या केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सर्व बाबी तपासून तीन तत्कालीन सरपंचापैकी दोन तत्कालीन सरपंचावर अपात्रतेची कारवाई केली आहे. त्यांचे ग्रामपंचायत मधील सदस्य पदही अपात्र केले असल्याचा निकाल २३ सप्टेंबरला २०२५ ला दिला आहे. याबाबत अर्जदाराच्यावतीने स्वतः ड. युवराज पोटे यांनी आपली बाजू खंबीरपणे मांडली होती तर अपात्र झालेल्या तत्कालीन सरपंचाच्या वतीने ड. खान यांनी बाजू मांडली होती.

झारगडवाडी गावामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व बेकायदेशीर कामे चालली होती याविरुद्ध मी तक्रार दिली होती. २३ सप्टेंबर २५ रोजी आयुक्त साहेबांनी आदेश देऊन दोघांना अपात्र केले असले तरी अपहार केलेल्याची रक्कम वसुली व ग्रामपंचायत कागदपत्रांमधील फेरफार बाबत पाठपुरावा करून न्यायाची मागणी पुणे आयुक्त व पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करणार असल्याचे ड. युवराज पोटे यांनी सांगितले आहे.

## वरिष्ठ न्यायालयात दाद मागणार

सदर आलेला निकाल आम्हाला अपेक्षित नव्हता, याबाबत आम्ही वरिष्ठ न्यायालयात लवकरच दाद मागणार असून खरी वस्तुस्थिती कोर्टासमोर मांडणार आहोत. न्यायदेवता आम्हाला न्याय देतील अशी आम्हाला खात्री आहे, असं अपात्र झालेल्या तत्कालीन सरपंच वैशाली संतोष मासाळ यांनी सांगितले आहे.

# धक्कादायक! ठेकेदाराने कामावरून काढलं, मजुरांनी बदला घेण्यासाठी ठेकेदाराच्या ३ वर्षांच्या पोरीला केलं किडनॅप

**पुणे । प्रतिनिधी**

ठेकेदाराने कामावरून काढल्याचा राग मनात ठेवून दोन मजुरांनी बदला घेण्यासाठी भयंकर कृत्य केले आहे. ठेकेदाराच्या तीन वर्षांच्या मुलीला पळवून घेऊन गेल्याचा प्रकार समोर आल्याने पुण्यातील विमाननगर भागात मोठी खळबळ उडाली आहे. मुलीचं अपहरण केल्यानंतर दोन्ही मजुरांनी तिला इंद्रायणी एक्सप्रेसमध्ये चढवलं. यानंतर विमानतळ पोलिसांनी अवघ्या काही तासात अपहरण तीन वर्षांच्या मुलीची सुटका केली आहे. तसेच आरोपींनाही पोलिसांनी अटक केली आहे. प्रिन्स पाल आणि ओम नारायण पाल असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. हे दोन्हीही आरोपी झारखंडचे असल्याची माहिती मिळाली आहे.

काम व्यवस्थित करत नसल्याच्या कारणाने ठेकेदाराने झारखंड मधील दोन मजुरांना कामावरून काढून टाकले. ल कामावरून काढल्याचा राग मनात धरून दोघांनी बदला घेण्याचे ठरवले. दोन्ही खजुरांनी ठेकेदाराच्या तीन वर्षांच्या मुलीचे अपहरण



केले. ते इंद्रायणी एक्सप्रेस मधून तिला कुठेतरी घेऊन जात असल्याचं पोलिसांना समजतात लोहमार्ग पोलिसांच्या मदतीने दोघांना कल्याण रेल्वे स्टेशनवर जेरबंद करून मुलीची सुखरूप सुटका करण्यात आली . प्रिन्स पाल आणि ओम नारायण पालसे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत .वेगवेगळ्या बांधकाम साइटवर ठेकेदार हे मजूर पुरवण्याचं काम करतात .पण या दोन्ही मजुरांचं काम व्यवस्थित नसल्याने त्यांना कामावरून काढून टाकले होते .या गोष्टीचा राग मनात धरून ठेकेदाराच्या तीन वर्षांच्या मुलीचे सोमवारी त्यांनी अपहरण केले . बराच वेळ झाला तरी मुलगी घरात दिसत नाही म्हणून पालकांनी परिसरात शोधा शोध केली .पण शेवटी घाबरलेल्या पालकांनी पोलिसांना तक्रार केली .तसेच मजुरांवर संशय असल्याचेही बोलून दाखवलं .त्यानंतर पोलिसांनी तातडीने अधिक चौकशी करत शोध चालू केला .काम सोडून जाणाऱ्यांपैकी चौघेजण बिहार कडे चालले होते .पोलिसांनी सापळा रचत कल्याण रेल्वे स्थानकावरून दोन आरोपींसह तीन वर्षांच्या मुलीला ताब्यात घेतले .मुलीची सुटका करून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे .

# घायवळ गँगच्या गुंडांना बघून रस्त्यावरचे कुत्रे भुंकायला लागले ; कोथरुडमध्ये पोलिसांनी भाईंची धिंड काढली

**पुणे । प्रतिनिधी**


पुण्यात अलीकडेच झालेल्या टोळीयुद्धानंतर सर्वसामान्य नागरिकांमध्ये दहशतीच वातावरण निर्माण झालं आहे. अशातच आता पोलिसांनी यावर उपाय म्हणून गुंडांना पोलिसी हिसका दाखवल्याचे बघायला मिळाले आहे. कोथरूड परिसरात कुख्यात निलेश घायवळ(पळश्रशीह ऋह्रू्रश्र) टोळीच्या सदस्यांनी एका सर्वसामान्य व्यक्तीवर गोळीबार केला. या गोळीबारात ३६ वर्षीय प्रकाश धुमाळ (झीरज्ञरीह उर्हीरश्र) गंभीर जखमी झाले (झींपश उीळाश छश्ुी) असून त्यांच्या मानेला आणि मांडीला गोळ्या लागल्या आहेत. सध्या त्यांच्यावर सह्याद्री रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान हि घटना ज्या भागात घडली त्याच पुण्यातील कोथरूड परिसरामध्ये तरुणावर गोळीबार करणाऱ्या गुंडांची पोलिसांनी धिंड काढली आहे.



गोळीबार करणाऱ्या कुख्यात गुंड निलेश घायवळ यांच्या गुंडांची कोथरूड परिसरात पोलिसांनी हि धिंड काढली आहे. यात मयूर कुंबरे, मयंक व्यास, गणेश राऊत, दिनेश फाटक, आनंद चादलेकर या पाचही जणांची पोलिसांनी धिंड काढली आहे. ज्या ठिकाणी या पाच जणांनी सामान्य नागरिकावर गोळीबार करून दहशत निर्माण केली होती त्याच भागातून आता पोलिसांनी दिंड काढल्याचे बघायला मिळाले आहे. माहितीनुसार, गाडीला साईड न दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून ही जीवघेणी कारवाई करण्यात आली. गोळीबार होताच जीव वाचवण्यासाठी प्रकाश धुमाळ जवळील एका इमारतीकडे धावले. यावेळी स्थानिक सचिन गोपाळघरे यांनी धुमाळ यांना मदत केली. घायवळ टोळीतील मयूर कुंबरे याने थेट गोळीबार केल्याचे उघड झाले आहे. दरम्यान हा घटनेसह आरोपींना आणखी एका सामान्य नागरिकावर कोयत्याने हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. निलेश बन्सीलाल घायवळ हा पुण्यातील कुख्यात गुंड म्हणून ओळखला जातो. तो मूळचा सोनेगाव, ता. जामखेडचा असून उच्चशिक्षित आहे. पुण्यात शिक्षणासाठी आल्यानंतर त्याने मास्टर इन कॉमर्सची डिग्री पूर्ण केली. मात्र, शिक्षण घेऊन नोकरी करण्याऐवजी तो गुन्हेगारी जगतात शिरला.

२००० ते २००३ या काळात घायवळची भेट गजानन मारणे याच्याशी झाली. दोघांनी मिळून एका खुनाची घटना घडवली आणि सात वर्षांची शिक्षा भोगली. जेलमधून सुटल्यानंतर घायवळ आणि गजा मारणे यांच्यात आर्थिक व्यवहार आणि वर्चस्वाच्या कारणावरून वाद निर्माण झाला. यामुळे दोघांमध्ये वैराचे नाते तयार झाले.

# पुण्यातील एमआयटी कॉलेज परिसरात आढळला मृतदेह, विद्यार्थ्यांची धावाधाव; पोलिसांनी घेतला



**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीच्या घटनांनी चर्चेत असलेल्या पुण्यातील (झींपश) एका महाविद्यालय परिसरात वयस्कर व्यक्तिचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. पुण्यातील एमआयटी महाविद्यालयाच्या (उेश्रश्रशसश) कॅम्पसमध्ये हा मृतदेह आढळून आला आहे. याबाबत माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी (झेश्रळलश) घटनास्थळी धाव घेऊन मृतदेहाची ओळख पटवत मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवला आहे. सुभाष कामठे असे ६५ वर्षीय मृत व्यक्तीचे नाव असून मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. सुभाष कामठे मूळचे पुण्यातील फुरसुंगी परिसरात राहण्यास असल्याची प्राथमिक माहिती असून ते गेल्या २ दिवसांपासून घरातून बेपत्ता होते. तसेच, कामठे यांना दारूचे देखील व्यसन असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली आहे. एमआयटी महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये त्यांचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली असून विद्यार्थ्यांमध्येही भीतीचे वातावरण पसरले होते. शुक्रवारी दुपारी त्यांचा मृतदेह आढळून आला होता. पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत. दरम्यान, संबंधित व्यक्तीने आत्महत्या केली की त्याची हत्या करण्यात आलीय, याचा शोध पोलीस घेत आहेत. मात्र, दारुच्या नशेत पाण्यात उडी घेत संबंधित व्यक्तीने आमहत्या केल्याची चर्चाही परिसरात होत आहे.

# पुणे-बंगळूरू महामार्गावर टँकरला भीषण आग



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे बंगळूरू महामार्गावरून साताऱ्याकडे जाणाऱ्या टँकरला आग लागल्याची घटना घडली. सतर्क नागरिकाने याबाबत अग्निशामक दलाला कळविले. त्या नागरिकाने केमिकल असल्याची शक्यता दर्शविल्याने अग्निशामक दलाच्या ३ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आग अवघ्या ५ ते १० मिनिटात आग आटोक्यात आली. मात्र, त्यामध्ये केमिकल नसून, शिरवळ येथे एका कंपनीसाठी जाणारे ऑईल असल्याचे निष्पन्न झाले.

बुधवारी (दि. २४) दुपारी १२.५० च्या सुमारस याबाबत अश्निशामक दलाला कॉल आला. सिंहरोड रोड अश्निशामक दलाचे केंद्रप्रमुख प्रभाकर उमराटकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईहून शिरवळ येथील एका कंपनीसाठी हे ऑईल नेण्यात येत होते. जांभुळवाडी येथील दरी पूल ओलांडल्यानंतर टँकरला आग लागली.

ओव्हर हिटींग अथवा वायरिंग शॉर्ट झाल्यामुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. केमिकल असल्याचा संशय अग्निशामक दलाला फोन केलेल्या सतर्क नागरिकाने व्यक्त केला होता. त्यामुळे सिंहगड रोड, नवले ब्रिज आणि पीएमआरडीएची प्रत्येकी १ गाडी घटनास्थळी पोहोचली. मात्र, तिथे गेल्यावर गाडीत आईल असल्याचे समजले. तिन्हीत गाडीत असलेल्या १० ते १२ जवानांनी आग त्वरित आटोक्यात आणली.

# श्री महालक्ष्मी मंदिरासमोर श्रीसूक्त पठण

**पुणे । प्रतिनिधी**

शेकडो महिला आणि पुरुषांनी सामूहिकरीत्या केलेल्या श्रीसूक्त आणि श्री गणपती अथर्वशीर्ष पठणातून देवी शक्तीची आराधना करण्यात आली. या वेळी वरुणराजाही बरसला; परंतु देवीच्या गजराने आणि शंखनादाने मंगळवारची पहाट मंगलमय झाली.



श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबागतर्फे सार्वजनिक नवरात्रोत्सवाच्या दुसऱ्या माळेला सामूहिक श्रीसूक्त पठणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी मंदिराच्या विश्वस्त डॉ. तृप्ती अग्रवाल, भरत अग्रवाल, ड. प्रताप परदेशी, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर आदी उपस्थित होते. ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला

कार्यक्रमाची सुरुवात शंखनाद पथकातील वादकांच्या शंखवादनाने झाली. कार्यक्रमास पारंपरिक वेशात उपस्थित महिलांनी जय माता दी च्या जयघोष करत आसमंत दणाणून सोडला. श्रीसूक्त म्हणजे काय, त्याचे महत्त्व आणि महती याविषयी उपस्थितांना माहिती देण्यात आली. त्यानंतर अथर्वशीर्षाचा एक पाठ आणि श्रीसूक्ताचे तीन पाठ असे सामूदायिकरीत्या पठण करण्यात आले.

कार्यक्रमाची सांगता आरतीने झाली. मंदिराच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी नृत्यांगना नृत्य अकॅडमीच्या राधिका आवटे आणि सहकाऱ्यांनी दशावतार सादरीकरण केले.‘धार्मिकतेला सामाजिकतेची जोड देणारा समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारा सार्वजनिक नवरात्र उत्सव महालक्ष्मी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही साजरा होत आहे. सामूहिक श्रीसूक्त पठणाच्या माध्यमातून महिला शक्तीने एकत्र येऊन स्त्री शक्तीचा जागर करावा, हा उद्देश दरवर्षी असतो. यंदा श्रीसूक्त पठणाच्या कार्यक्रमासह नारीशक्तीचा सन्मान, सामूहिक गरबा आणि प्रतीकात्मक रावण दहन कार्यक्रम होणार आहे. अशी माहिती डॉ. तृप्ती अग्रवाल, विश्वस्त, श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग यांनी दिली.

# निवडणुकीसाठी महापालिकेची लगबग; प्रशासनाकडून २३ कक्षांची स्थापन

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकांच्या तयारीसाठी महापालिका प्रशासनाकडून वेगवेगळ्या तब्बल २३ कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. या कक्षांचे काम करण्यासाठी अधिकारीही नियुक्त करण्यात आले असून, त्यांनी तत्काळ कामाला सुरुवात करण्याचे आदेश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी नुकतेच काढले आहेत.




या कक्षांमध्ये निवडणूक कर्मचारी व व्यवस्थापन कक्ष, मतदान केंद्र सुविधा कक्ष, थकबाकी ना हरकत प्रमाणपत्र कक्ष, मतमोजणी कक्ष अशा वेगवेगळ्या कक्षांचा समावेश आहे. या कक्षांच्या कामकाजासाठी नेमण्यात आलेल्या या अधिकाऱ्यांच्या सेवाही अधिग्रहित करण्यात आल्या असून, या कक्षांनी वेगवेगळ्या टप्प्यात करण्यात आलेल्या कामांचा अहवाल महापालिका आयुक्तांना तत्काळ सादर करायचा आहे.

तसेच कक्षासाठी कर्मचारी कक्षप्रमुखांनी उपलब्ध करून घ्यायचे असून, या कोणत्याही कक्ष प्रमुखांनी थेट निवडणूक आयोग अथवा राज्यशासनाशी संपर्क न साधता उपायुक्त निवडणूक यांच्यामार्फतच संपर्क साधायचा आहे, तसेच निवडणूक संपेपर्यंत ही जबाबदारी संबधितांवर असणार आहे.

निवडणूक कर्मचारी व व्यवस्थापन, मतदान केंद्र व सोयीसुविधा, टपाली मतपत्रिका व्यवस्थापन, थकबाकी ना हरकत प्रमाणपत्र, मतदान व मतमोजणी, स्टेशनरी, साहित्य वितरण, माहिती व जनसंपर्क, दूरसंचार सुविधा, बैठकांचे आयोजन, आचारसंहिता, विद्रूपीकरण कारवाई, पेड न्यूज, वाहतूक व्यवस्थापन, सभा मंडप परवानगी, विद्युत व्यवस्थापन, माहिती व तंत्रज्ञान, ई. व्ही. एम व्यवस्थापन, समन्वय, निवडणूक खर्च, विधी, आरोग्य, पाणीपुरवठा व्यवस्थापन.

# साडे चारशेपेक्षा जास्त महिला कर्मचाऱ्यांचा स्वच्छतेत सहभाग

## कचरा विलगीकरणसह स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यावर देखील दिला जातोय भर

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेने स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये देशात सातवा व राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. महापालिकेकडून राबवण्यात आलेली स्वच्छता मोहीम, कचरा विलगीकरण, स्वच्छतेबाबत जनजागृती, आर.आर.आर (रिड्यूस-रियुज-रिसायकल) प्रकल्प तसेच शून्य कचरा प्रकल्प अशा विविध प्रकल्पांमुळे शहराच्या सार्वजनिक स्वच्छतेत उल्लेखनीय बदल घडून आला आहे. या सर्व उपक्रमांच्या यशामागे नागरिकांचा सहभाग जितका महत्त्वाचा आहे, तितकाच सहभाग स्वच्छता कर्मचाऱ्यांचा आहे. यामध्ये महिला सफाई कर्मचाऱ्यांची संख्या साडेचारशेपेक्षा जास्त असून पिंपरी चिंचवड शहराची स्वच्छतेची धुरा सांभाळण्यामध्ये या कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.



पिंपरी चिंचवड महापालिकेने स्वच्छ शहर, सुंदर शहर हे ध्येय गाठण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली शहरात विविध अभिनव उपक्रम राबविले जात आहेत. पिंपरी चिंचवड शहराचा विस्तार मोठा आहे. यामध्ये आठ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ३२ प्रभाग असलेल्या या शहराची स्वच्छतेची व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. विशेष म्हणजे यामध्ये महिला सफाई कर्मचाऱ्यांची संख्या लक्षणिय आहे. या महिला कर्मचाऱ्यांकडून सातत्याने नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यास प्राधान्य दिले जाते.

**निरीक्षकपदावर आठ महिला कार्यरत**

पिंपरी चिंचवड महापालिकेत आरोग्य विभागात महिला आरोग्य निरीक्षक संतोषी कदम, रश्मी तुंडलवार, स्नेहल सोनवणे, स्नेहल सुकटे, रुपाली साळवे, स्नेहा चांदणे, कोमल फर्डे आणि मलेरिया निरीक्षक रुपाली शेटे या निरीक्षकांनी आपल्या कार्यातून नागरिकांमध्ये जनजागृती करून त्यांना स्व